जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com






महाराष्ट्र सरकारने विधानसभेत मांडलेल्या महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक क्रमांक ३३ विरोधात आयटक, भाकप आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीच्यावतीने २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.

# शासनाच्या दडपशाहीविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने

## जनसुरक्षा विधेयक रद्द करण्याची मागणी; शहरी नक्षलवादाच्या नावाखाली संविधानिक स्वातंत्र्यावर गदा, विविध पक्ष–संघटनांचा आरोप

नगर – महाराष्ट्र सरकारने विधानसभेत मांडलेल्या महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक क्रमांक ३३ विरोधात आयटक, भाकप आणि जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समितीच्यावतीने २२ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. हे विधेयक नक्षलवाद्यांच्या विरोधात नसून, संविधानाच्या चौकटीत काम करणाऱ्या संघटना व कार्यकर्त्यांवर दडपशाही करण्यासाठी असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

या आंदोलनात विविध सामाजिक, कामगार व नागरी हक्कासाठी लढणाऱ्या संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. यावेळी घोषणाबाजी करत विधेयक त्वरित रद्द करण्याची मागणी करण्यात आली. आंदोलनात भाकपचे जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, आयटकचे राज्य उपाध्यक्ष ॲड. कॉ. सुधीर टोकेकर, अशोक सब्बन, अर्शद शेख, कॉ. सतिश पवार, सुभाष शिंदे, कॉ. बबन सालके, कॉ. संतोष खोडदे, कॉ. बेबी राऊत, आप्पासाहेब वाबळे, कॉ. रामदास वागस्कर, वीरबहादूर प्रजापती, कॉ. सुभाष कडलग, नलिनी गायकवाड, दीपक पापडेजा, भारती न्यालपेल्ली, संगीता कोंडा, रवी सातपुते, सगुणा श्रीमल, कॉ. मुनोत, अविनाश साठे, कॉ. सोमनाथ केंदले, विलास मिसाळ, संदीप सकट, कॉ. उमाप आदींसह भ्रष्टाचार निर्मूलन, पीस फाऊंडेशन, आम आदमी पार्टी, विडी कामगार संघटना, एमआयडीसी कामगार संघटना व अवतार मेहेरबाबा ट्रस्ट आदी विविध संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकाचे उद्दिष्ट शहरी नक्षलवादाचा बंदोबस्त असे सांगितले असले तरी, विधेयकात नक्षलवाद किंवा शहरी नक्षलवाद हे शब्दच नाहीत. बेकायदेशीर कृत्य आणि ते करणाऱ्या बेकायदेशीर संघटना असा अत्यंत अस्पष्ट व मोघम अशी व्याख्या केलेली आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांपासून ते संविधानिक अधिकारांसाठी लढणाऱ्या संघटनांपर्यंत कोणालाही लक्ष्य करता येईल, अशी भीती आंदोलकांनी व्यक्त केली. सरकार व सरकारी यंत्रणांवर टीका करणे, धोरणांची चिकित्सा करणे अथवा आंदोलन करणे या लोकशाहीतील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच हा कायदा गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा म्हणजे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवरच घाला असल्याचा ठाम आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

हे विधेयक संपूर्णपणे मागे घेण्याची आणि लोकशाहीचे मूल्य जपण्याची मागणी सर्व संघटनांनी एकमुखाने केली. सदर मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांना देण्यात आले. महाराष्ट्रात इतर जिल्ह्यांमध्येही अशाच प्रकारची आंदोलने होत असून, या कायद्याविरोधात राज्यव्यापी संघर्ष छेडण्यात आले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन...



### ’ती’ मोठ्या संकटात आहे.. सावधान..

ती म्हणजे आपली पृथ्वी, विष्णूपत्नी, अवनी वसुंधरा... आज जागतिक वसुंधरा दिन. अंतरिक्षातून निळीशार दिसणारी, मनमोहक वसुंधरा सूर्यमालेतील स्वर्गच जणू!

निसर्गाच्या विविधतेने नटलेली आपली वसुंधरा हळूहळू उष्णता, प्रदूषणाच्या वणव्यात जळू लागली आहे. प्रचंड जंगलतोड, वणवा, वृक्षांच्या नष्ट होण्याने वसुंधरा होरपळत चालली आहे.

स्वार्थांध मानवाच्या भौतिक विकासाच्या अभिलाषेने तिचा ऱ्हास होतो की काय ही जागतिक भिती आकार घेऊन आक्राळविक्राळ स्वरूप घेत आहे.

जगभरात वाढत्या शहरीकरण व घरांच्या, औद्योगिकरणाच्या निर्मितीत वृक्षवल्ली नामशेष होत आहे. अगोदरच कमी असलेल्या जमिनी, जंगलांची कमी भविष्याच्या संकटांची नांदी देत आहे.आपण मानव निसर्गरूपी वसुंधरेला ओरबडत असतांना निसर्गही वादळे, अतिवृष्टी, त्सुनामी, महाप्रलय सारख्या गोष्टींनी आपल्याला जागे करण्याचा प्रयत्न करतोय पण आपणास भानच नाहीय.

१०० वर्षांपूर्वी बाटलीतून पाणी (विकतचे) प्यावे लागेल हे खोटं वाटायचे. आता ५०–६० वर्षांनी ऑक्सिजनची व्यवस्था स्वतःबरोबर ठेवावी लागेल असे वाटते.

निसर्गाच्या हातात हात घालून चालावे लागेल. झाडे लावून जगवावी लागतील. पाण्याचा साठा करून भूमिगत पातळी वाढवावी लागेल. यासाठी योजना आणून सरकार सवलती देऊ शकतात. खरंतर प्रत्येक ग्रामपंचायत व शहरातील मोठमोठ्या बिल्डर्सने जलशिवार, वनवाटिका, कृत्रिम जंगलांची निर्मिती करण्यास सक्ती करावी. यातून ते स्वावलंबी बनू शकतील. आपल्या सगळ्यांना कळतंय पण वळत नाहीय. गंभीर व्हावे लागेल – ‘ती संकटात आहे’. वसुंधरा दिनी तिच्या संरक्षण–संवर्धनाची सुरुवात करु या.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : “मुसाफिर”–९८२२०२०६९१

### सिंधूबाई मळेकर यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – पाईपलाईन रोड वरील लालगुलाब कॉलनीतील रहिवासी श्रीमती सिंधूबाई नारायण मळेकर (वय ८६) यांचे २१ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर २२ एप्रिल रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# गोवंशीय जनावरांची वाहतूक करणारा पिकअप पकडला; १३ वासरांची सुटका

नगर – गोवंशीय वासरे कत्तल करण्याच्या उद्देशाने पिक अप मध्ये दाटीवाटीने भरुन त्यांना चारा पाण्याची व्यवस्था न करता वाहतूक करणारा पिक अप एमआयडीसी पोलिसांनी २१ एप्रिल रोजी सकाळी देहरे शिवारातील हनुमान मंदिरासमोर पकडला आहे. या कारवाईत तेरा गोवंशीय वासरासह एकास ताब्यात घेतले.

देहरे शिवारातून गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याकरिता पिक अप मधून वाहतूक होत असल्याची माहिती एमआयडीसी पोलिसांना मिळाली त्या माहितीवरून एमआयडीसी पोलिसांनी देहरे शिवारातील हनुमान मंदिर येथे तत्काळ कारवाई करून जनावरांची बेकायदा वाहतूक करणारा ताब्यात घेतला. पिक अप मधील इसमास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव किशोर रखमाजी पठारे (रा. करांडे वस्ती, देहरे, ता.नगर) असे सांगितले. पोलिसांनी पिक अप ची पाहणी केली असता त्यामध्ये गोवंशीय वासरे दाटीवाटीने बांधलेले असल्याचे दिसून आले पोलिसांनी पिक अप मधील ७ हजार रुपये किमतीचे ७ वासरे, ६ हजार रुपये किमतीचे ६ वासरे आणि टेम्पो चालक किशोर पठारे यास ताब्यात घेतले.

या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी सागर गोरख भांबरे (वय २४, रा.नेप्ती, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन किशोर पठारे याच्या विरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधि ११ (१), (इ), ११(१) (ड), ५, ९ प्रमाणे गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलीस हवालदार मिसाळ हे करीत आहेत.

# पोलीस अधीक्षक कार्यालयातच ‘राष्ट्रध्वजा’चा होत आहे अवमान

*(पान १ वरुन)*

हा निर्णय भारताचे राष्ट्रपती घेतात, तसेच ते शोकाचा कालावधी देखील ठरवतात. जेव्हा ध्वज अर्ध्यावर फडकवायचा असतो, तेव्हा तो प्रथम ध्वजाच्या मास्टच्या शीर्षस्थानी उंचावला जातो आणि नंतर हळू हळू खाली आणला जातो. परंतु पोलीस अधीक्षक कार्यालयावरील तिरंगा हा कोणत्याही राष्ट्रीय शोक घोषित नसताना सुद्धा निम्म्यावर आला आहे.

राष्ट्रध्वजाचा अपमान केल्यास मात्र तीन वर्षं तुरुंगवास आणि पहिल्यांदाच गुन्हा केल्यास दंड करण्याची तरतूद आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयऐवजी जर इतर कार्यालयावर अथवा खाजगी इमारतीवर अशा पद्धतीने तिरंगा फडकत असतात, त्याबाबत तक्रार केली असती तर पोलिसांनी तातडीने कारवाई केली असती. आता खुद पोलीस अधिक्षक कार्यालयावरच अशा अवमानकारक पद्धतीने तिरंगा असल्याने नेमकी पोलीस अधिक्षक कुणावर व काय कारवाई करणार? हे सामान्य नागरिक म्हणून जाणून घ्यावेसे वाटते, असे ही बाब निदर्शनास आणून देणारे ॲड. श्याम आसावा यांनी म्हटले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या जवळ असलेला हा तिरंगा कोणत्याही अधिकाऱ्यांना निदर्शनास येऊ नये, ही मोठी दुर्दैवी बाब आहे. कायदा सुव्यवस्थेचे प्रश्न, वाढलेली गुन्हेगारी व अशा पद्धतीने स्वतःच्याच कार्यालयात राष्ट्रध्वजाचा होत असलेला अपमान या बाबी पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी गांभीर्याने घ्यायला हव्यात, अशी अपेक्षाही या नागरिकाने व्यक्त केली आहे.

### श्रीमती लिलाबाई कोठारी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – सारसनगर येथील आशिर्वाद कॉलनीतील करपे विटभट्टी जवळील रहिवासी श्रीमती लिलाबाई झंकारमल कोठारी (मिरजगाववाला, वय ८७) यांचे २२ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या नरेंद्र कोठारी यांच्या मातोश्री तर मयुर व दिया कोठारी, मोना कटारिया यांच्या आजी होत.

# जिल्हा शासकीय रुग्णालयातून रुग्ण पळाला

*(पान १ वरुन)*

केले होते. तेथे त्यांच्यावर उपचार सुरु होते. त्यांना रुग्णालयातील वार्ड क्रमांक १२ मध्ये दाखल केलेले होते. बाबासाहेब बर्डे यांच्यावर औषधोपचार सुरु असताना २१ एप्रिल रोजी पहाटे १.१५ वाजण्याच्या सुमारास ते वार्डमधून बाहेर येत रुग्णालयातून बाहेर पळून गेले.

मात्र पळत असताना रोडवर पत्रकार चौक येथून जात असताना भरधाव वेगातील अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. या धडकेत ते गंभीर जखमी झाले. त्यांना नागरिकांच्या मदतीने खासगी रुग्णवाहिका चालक गोविंद उर्फ किरण थोरात यांनी उपचाराकरिता जिल्हा रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरानी त्यांना तपासून उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी यांनी दिलेल्या अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद केलीआहे. अधिक तपास महिला पोलीस हवालदार मरभळ या करत आहेत.

## ११ दिवसांपूर्वी पळालेल्या रुग्णाचा शोध लागेना

जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असताना ११ एप्रिल रोजी रात्री १०.३० ते ११.३० या कालावधीत एक रुग्ण पळून गेलेला आहे. त्याचाही अजून शोध लागलेला नाही. बिपीन बिंदेश्वर चौधरी (वय ४८) असे या रुग्णाचे नाव आहे. त्याच्यासह काही जणांना शिर्डी येथे भिक्षेकरू म्हणून पकडून विसापूर कारागृहातील बेगर होम येथे ठेवलेले होते. १० एप्रिल रोजी बिपीन चौधरीसह इंद्रभान गोसावी हे आजारी पडल्याने त्यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात वार्ड क्र. १ मध्ये दाखल करण्यात आले होते. ११ एप्रिल रोजी रात्री १०.३० वाजता इंद्रभान गोसावी याची प्रकृती बिघडल्याने त्याला केअर टेकर विकास छजलानी व इतर सहकाऱ्यांनी आयसीयुमध्ये हलविले. त्यानंतर ते पुन्हा वार्ड १ मध्ये आले असता बिपीन चौधरी हा तेथून पसार झाल्याचे निदर्शनास आले. त्याचा सर्वत्र शोध घेवूनही तो मिळून न आल्याने याबाबत विकास छजलानी यांनी दिलेल्या तक्रारीवरून तोफखाना पोलिसांनी हरविल्याची नोंद केली आहे. याचा तपास पोलिस अंमलदार सुनिल आंधळे हे करीत असून, अद्यापही या रुग्णाचा शोध लागलेला नाही.

### नारायण धांबोरे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – धोत्रे बु. येथील रहिवासी नारायण दगडु धांबोरे (वय ८०) यांचे २२ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर धोत्रे बुद्रुक येथील अमरधामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ४ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भाऊसाहेब धांबोरे यांचे ते वडील होत.

### प्रभाकर गाडेकर यांचे दु:खद निधन



नगर – सावेडी, सिव्हील हाडको येथील प्रभाकर सिताराम गाडेकर (वय ८३) यांचे १८ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. ते एस टी महामंडळ अहमदनगर येथे पार्सल इन्चार्ज म्हणून सेवानवृत्त झालेले होते. त्यांच्या मागे त्यांची पत्नी, २ भाऊ, बहीण व नातवंडे असा परिवार आहे.

### शहाचंद ललवाणी यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पुणे गुलटेकडी मार्केट यार्ड मधील जुन्या पिढीतील मिरचीचे व्यापारी तथा ललवाणी ॲण्ड कंपनीचे संचालक शहाचंद बालचंद ललवाणी (वय ७०) यांचे अल्पशा आजाराने २२ एप्रिल रोजी निधन झाले.



मूळचे चौसाळा (जि. बीड) येथील रहिवासी असलेले शहाचंद ललवाणी यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत पुण्यामध्ये मिरचीचा व्यवसाय सुरू केला होता. गणराज मसाले या नावाने विविध उत्पादने सुरू केली होती. गेल्या एक महिन्यापासून ते पुण्यातील खासगी रुग्णालयात उपचार घेत होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजयी, बहिणी, मेहुणे, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. नगर येथील श्री गणेश ट्रान्सपोर्टचे संचालक सुनीलकुमार महावीरकुमार ललवाणी यांचे चुलत ज्येष्ठ बंधू तर भारतीय जैन संघटनेचे अध्यक्ष शांतीलाल मुथा यांचे ते मावस बंधू होत.

# बसस्थानकातून महिलेच्या पर्समधून सोन्याचे दागिने चोरट्यांनी केले लंपास

नगर – पुणे येथे जाण्याकरिता एसटी बस वाट पाहत असलेल्या प्रवासी महिलेच्या पर्समधील तीन तोळ्याचे सोन्याचे दागिने कोणीतरी चोरट्याने नजर चुकवून चोरून नेल्याची घटना २१ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास शहरातील स्वस्तिक चौकाजवळील पुणे बस स्थानक येथे घडली.

याबाबत लता संतोष भोर (वय ४४, रा– सेक्टर नं–२७ ए प्लॉट नं–४३२, निगडी प्राधिकरण, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी लता भोर या २ दिवसापुर्वी पुणे निगडी येथुन नगर येथे नातेवाईकांचा लग्न सोहळा असल्याने लग्नाला आल्या होत्या. लग्न झाले नंतर पुणे येथे बसने जायचे असल्याने गर्दीमध्ये चोरी होऊ नये म्हणुन त्यांनी गळ्यातील सोन्याचे गंठण व कानातले झूमके काढून डबीमध्ये ठेवले व ती डबी बॅगमध्ये ठेवली, त्यानंतर त्या बहिणीसह स्वस्तिक चौकाजवळील पुणे बसस्थानक येथे आल्या. त्यांच्या बहिणी गीता इंगळे, श्वेता इंगळे (रा. देऊळगाव सिध्दी, ता.नगर) या दोघी त्यांना पुणे बसस्थानक येथे सोडण्याकरीता आल्या होत्या.

लता भोर यांना पुणे निगडी येथे जायचे असल्याचे त्या पुणे बसस्थानक येथे बसची वाट पाहत होत्या. परंतु बराच वेळ होवुन देखील त्यांना बस मिळाली नाही. बसस्थानक येथे मोठ्या प्रमाणात गर्दी होती. त्यावेळी त्यांनी बॅगेच्या मधल्या कप्प्यात ठेवलेले गंठण व कानातले झूमके डबीत व्यवस्थित ठेवलेले आहे का हे खात्री करण्यासाठी बॅगची चेन उघडुन पाहिली असता त्यांना बॅगमध्ये ठेवलेली डबी व त्यात ठेवलेले सोन्याचे गंठण व झूमके मिळुन न आल्याने त्यांची खात्री झाली की कोणीतरी अज्ञात चोरट्याने बॅगमध्ये ठेवलेले २५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील झुमके असे सोन्याचे दागिणे चोरुन नेले आहे. त्यामुळे त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास पोलीस हवालदार योगेश कवाष्टे हे करीत आहेत.

# महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र सावेडीत दुचाकीस्वाराने पळविले

नगर – पतीसह दुचाकीवरुन जाणाऱ्या महिलेच्या गळ्यातील ५ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र दुचाकी वरुन आलेल्या अनोळखी इसमाने बळजबरीने हिसकावून तोडून नेल्याची घटना नगर मनमाड रोडवरील सावेडी परिसरातील मराठा मंदिर दुकाना–समोर २१ एप्रिलला मध्यरात्री घडली.

याबाबत माधुरी राजेश भुतकर (वय ५० रा. धर्माधिकारी मळा सावेडी) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. फिर्यादी भुतकर या २० एप्रिल रोजी रात्री आठ वाजता बंधन लॉन्स येथे नातेवाईकांच्या कुटुंबातील हळद व संगीताचा कार्यक्रम असल्याने पतीसह त्यांच्या इलेक्ट्रिक चेतक गाडी (क्र. एम एच १६ डी एच ६६६९) ने कार्यक्रमास गेल्या होत्या. कार्यक्रम आटोपल्यानंतर रात्री १२.०५ वाजण्याच्या सुमारास त्या पतीसह बंधन लॉन्स येथून धर्माधिकारी मळा सावेडी येथे जात असताना मराठा मंदिर दुकानाच्या समोर अचानक अंधारातून त्यांच्या पाठीमागून एक दुचाकीवर अनोळखी इसम आला व त्याने त्याची गाडी जवळ घेऊन अचानक भुतकर यांच्या गळ्यात हात घालून त्यांच्या गळ्यातील ५ तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावून ओढून तोडून सावेडीच्या दिशेने पुढे गेला.

मानेला बसलेल्या हिसक्यामुळे सौ.भुतकर या ओरडल्या असता त्यांच्या पतीने काय झाले असे विचारले. त्यावेळी त्यांनी सांगितले की समोर चालणाऱ्या गाडीवरील इसमाने माझ्या गळ्यातील मंगळसूत्र तोडून नेले आहे. त्यावेळी भुतकर यांनी त्याचा पाठलाग केला परंतु तो मिळून आला नाही. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी माधुरी भूतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चोरट्याविरुद्ध जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# कोहिनूरच्या कलाविष्कार आर्ट गॅलरीत कला व कलेचा भोक्ता याचा संगम : पी.डी.कुलकर्णी

नगर – कलाकार आपल्या अगदी मनापासून आपल्या कलेची निर्मिती करत असतो. ती कला बहरण्यासाठी आधार व आश्रय लागत असतो. कोहिनूरचे गांधी परिवार कायमच कला व क्रीडा क्षेत्राला पाठबळ देत प्रोत्साहनही देत आहेत. त्यामुळे गांधी हा परिवार कलासक्त आहे. कोहिनूरच्या कलाविष्कार आर्ट गॅलरीत कला व कलेचा भोक्ता याचा संगम होत आहे. त्यामुळे कलाकारंना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम कलाकार घडवण्यासाठी व नगरचे नावलौकिक वाढवण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ रंगकर्मी पी.डी.कुलकर्णी यांनी केले.




सावेडी येथील कोहिनूर मॉल मधील ‘कलाविष्कार’ आर्ट गॅलरीत ज्येष्ठ चित्रकार प्रफुल्ल भिष्णूरकर व लीना आढाव यांच्या गाजलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना ज्येष्ठ रंगकर्मी पी.डी.कुलकर्णी.

अहिल्यानगरच्या सावेडी येथील कोहिनूर मॉल मधील कलाकारांसाठी हक्काचे व्यासपीठ असलेल्या ‘कलाविष्कार’ आर्ट गॅलरीत पुण्याचे ज्येष्ठ चित्रकार प्रफुल्ल भिष्णूरकर व लीना आढाव यांच्या गाजलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन पी.डी.कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. यावेळी मॉलच्या संचालिका श्वेता गांधी, ज्येष्ठ चित्रकार प्रमोद कांबळे, महावीर सोनटक्के, बालाजी वल्लाळ, विकास कांबळे, अविनाश सोनवणे, गौरव भोसले, रणजित थोरात आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी २७ एप्रिलपर्यंत सर्वांसाठी मोफत खुले आहे.

यावेळी लीना आढाव म्हणाल्या, मॉल मध्ये चित्रकलेला प्रोत्साहन देण्यासाठी वेगळे व्यासपीठ उपलब्ध करून देत कलाकारांचा अनोखा बहुमानच केला जात आहे. मॉल मधील या उत्कृष्ट आर्ट गॅलरीत आपली कला प्रदर्शित करण्यासाठी कलाकार उत्सुक असतील.

या प्रदर्शनात प्रफुल्ल भिष्णूरकर यांनी कोलाज चित्र प्रकार व लाईन वर्क चित्र प्रकारातील रेखाटलेली उत्कृष्ट चित्रे मांडण्यात आली आहेत. तसेच चित्रकार लीना आढाव यांनी अजंठा लेणीतील चित्रांची वेगळ्या पद्धतीने रेखाटलेली उत्कृष्ट चित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत.

संचालिका श्वेता गांधी यांनी स्वागत करून कलाकारांचा सन्मान केला. जास्त कलाकारांनी या आर्ट गॅलरीचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले.

# गृहिणी

## आरोग्य

### शरीर राहील ऊर्जावान

उन्हाळ्यात शरीर थंड आणि ऊर्जावान ठेवण्यासाठी खसखसचे लाडू खाणे फायदेशीर आहे. खसखस शरीराला थंडावा देते आणि निर्जलीकरण रोखते. हे लाडू शरीरातील उष्णता थंड करतात आणि उष्णतेमुळे होणारे नुकसान कमी करतात. जवाच्या सातूपासून बनविलेले लाडू पचन सुधारतात आणि शरीरात ऊर्जा टिकवून ठेवतात. हे लाडू विशेषत: उन्हाळ्यात शरीराला थंडावा देतात. त्याचबरोबर नारळाचे लाडू शरीरात ओलावा देखील टिकवून ठेवतात. यामुळे उन्हाळ्यात शरीर थंड राहते आणि त्वचाही निरोगी राहते.

## पाककला

### बनाना माफीन्स

**साहित्य :** पिकलेली केळी मध्यम आकाराची ३ केळी, १ कप कणिक / मैदा, १/२ कप साखर, १/४ कप तूप, ३/४ चमचा बेकिंग पावडर, १/२ चमचा बेकिंग सोडा, १/४ चमचा दालचिनी पूड, चिमूटभर मीठ, १ टीस्पून दूध (गरज पडल्यास), काजू, बेदाणे आवडीनुसार

**कृती :** एका बाऊलमध्ये केळी सोलून मॅश करून घ्या. त्यात साखर आणि तूप घालून चांगले एकत्र करून घ्या. दुसऱ्या बाउलमध्ये कणिक, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, मीठ आणि दालचिनी पूड एकत्र करून घ्या. कणकेच्या बाऊलमध्ये केळ्याचे मिश्रण घाला आणि एकत्र करा. जास्त फेटू नका. मिश्रण फार घट्ट असेल तर थोडे दूध घालून मिक्स करा. ओव्हन १८० डिग्री वर गरम करून घ्या. मफिन साच्यांना तूप लावून त्यात मोठ्या चमच्याने मिश्रण घाला. अर्धा साचा भरेल एवढे मिश्रण घाला. वरून काजू, बेदाणे घाला. ओव्हनमध्ये १८० डिग्री वर ३०-३५ मिनिटं बेक करा.

## वास्तू

### हनुमानजींचे चित्र

देवीदेवतांच्या चित्रांना घरात लावणे सकारात्मक ऊर्जेचा स्त्रोत मानले जाते. हनुमानजी बालब्रह्मचारी असल्याने त्यांचे चित्र बेडरुममध्ये लावू नये. घरात पंचमुखी हनुमानाचे चित्र लावल्याने घरातील दोष दूर होतात. फोटोवर सिंदूरचा तिलक लावावा.

## सल्ला

कचोरी किंवा पुरी बनवताना त्यात थोडे दही घाला अधिक कुरकुरीत बनेल.

## सौंदर्य

त्वचेवरील मृतपेशी काढून टाकण्यासाठी आठवड्यातून २-३ वेळा एक्सफोलिएशन करा. यामुळे त्वचेला ग्लो येतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २३ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, धनिष्ठा १२।०८, सूर्योदय ०६ वा. २८ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील. राजकीय व्यक्तींची कार्ये पूर्ण होतील.

**वृषभ** : साहित्यिकांच्या लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. दिवसभर व्यस्त राहाल. प्रवास होईल.

**मिथुन** : आरोग्य बरे राहील. कलाकारांना नवीन कल्पना सुचतील. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कर्क** : मानसिक स्थिरता वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल. पुर्वसुकृत फळास येवून अर्धवट राहिलेली सरकारी कामे पूर्ण होतील.

**सिंह** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट होईल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. पत्नी बरोबर वादविवाद होतील.

**कन्या** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. नोकरीत चांगला काळ राहिल.

**तूळ** : पुर्वी पासून असलेली एखादी योजना आज फळास येईल. किरकोळ वाहन अपघात होतील.

**वृश्चिक** : आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वोत्तम असेल. भाऊबंद डोके वर काढतील.

**धनु** : आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. गरजू लोकांना मदत कराल फलस्वरुप तुमची कार्ये मार्गी लागतील.

**मकर** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे.

**कुंभ** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद होतील. वाहन खरेदीसाठी उत्तम दिवस आहे.

**मीन** : आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. विवोहच्छूकांचे विवाह जुळतील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

दुकानदार : कशी साडी दाखवू बाई?
महिला : शेजारीण जळून जळून मेली पाहिजे अशी द्या...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताच्या कोणत्या व्यक्तींना 'ऑर्डर ऑफ कॅनडा'ने सन्मानित करण्यात आले आहे?


– डॉ. प्रदीप मर्चंट, नवजीतसिंह ढिल्लो, डॉ. व्यंकटरमण अय्यर लक्ष्मण

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१६१ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७१६० चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) विद्येची देवता; शारदा ५) व्याजाने कर्जाऊ पैसे देणारा; सावकार ८) जंगलाचा राजा; सिंह ९) आश्चर्य; चमत्कारिक १०) स्त्रियांचे एक वस्त्र ११) मोठा समुद्र १३) बाब; लेखणी; रक्कम १४) शोध; तपास; ठावठिकाणा १५) बुंदी वगैरे पाडण्यासाठी वापरले जाते ते छिद्र असलेले पात्र १७) करकरीत; न लिहिलेला (कागद वगैरे) १८) कारकीर्द २०) भारतातील प्रमुख नदी २२) जिवंत असेपर्यंत; मरेपर्यंत २३) सकस; सत्त्वयुक्त

**उभे शब्द :-** १) एकाच नवऱ्याची दुसरी बायको २) इंग्रजी धाव ३) लोकमान्य टिळकांची एक घोषणा – +++ + ++ ++सिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच ४) तिसरी तिथी; तृतीया ५) घोंगडी तयार करणारा; मेंढपाळ ६) पती; स्वामी; मालक ७) कर्जाच्या फेडीसाठी जप्त केलेला माल; असमर्थ १०) घट; घडा ११) घाण; विष्ठा १२) अधिकार; अंमल १३) बारा राशींपैकी एक; खेकडा १४) देश सोडून पळून गेलेला १६) श्रीमंत; धनवान १८) मनसेचे नेते – ++ ठाकरे १९) एकाग्र दृष्टी २१) थंड; शीतल

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : सन्मान लक्षात ठेवाल तर अहंकार वाढतो, सन्मान करणारा लक्षात ठेवाल तर कृतज्ञता वाढते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### कोणत्या कुशीवर झोपणे जास्त लाभदायक आहे?

डाव्या कुशीवर झोपल्याने अन्न सहज पचते. पोटावर योग्य दाब पडत असल्याने पचनक्रिया सुधारते. डाव्या कुशीवर झोपल्याने हृदयाला रक्तपुरवठा सुलभ होतो आणि त्यावरचा दाब कमी होतो. त्याचबरोबर अन्ननलिकेत ॲसिड पोहोचण्याचा धोका कमी होतो, ज्यामुळे ॲसिडिटी टाळता येते.

गर्भवती महिलांनी डाव्या कुशीवर झोपल्यास गर्भ आणि गर्भाशयाला पोषक रक्तपुरवठा होतो. डाव्या कुशीवर झोपल्याने स्वादुपिंडाच्या कार्यप्रणालीवर चांगला परिणाम होतो. स्लीप एपनिया, कंबरदुखी यांसारख्या समस्या असलेल्या व्यक्तींना उजव्या कुशीवर झोपणे उपयोगी पडते. डाव्या बाजूला झोपण्याचा शरीरावर चांगला परिणाम होतो. यामुळे शरीराचे रक्त परिसंचरण सुधारते, ज्यामुळे झोपेची स्थिती चांगली होते. यासह हृदयरोग, पोटाच्या समस्या, थकवा आणि आरोग्याच्या इतर समस्या दूर होतात. यामुळे हृदयाचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते.

डावी कुशी जास्त फायदेशीर मानली जाते, पण शेवटी कोणती कुशी आरामदायक वाटते, हे तुमच्या शरीरावर अवलंबून असते.

### आळस

एक आळशी मुलगा शाळेस जात असे. त्यास मुळाक्षरापैकी पहिल्या अक्षराचाही उच्चार काही केल्या करता येईना.

शेवटी पंतोजी म्हणाला, 'अरे, तोंड उघडून 'अ' म्हण.' त्या मुलाने तोंड पसरले, पण 'अ' म्हणण्याचा नुसता प्रयत्नही केला नाही! आपल्या प्रयत्नाचा काही उपयोग होणार नाही अशी पंतोजीची खात्री झाल्यावर, मुलांनी आपापसात त्यास समज देण्याचे ठरवले.

एकाने म्हटले, 'अ' म्हणणे ही इतकी कठीण गोष्ट नाही, असे मला वाटते. आळशी म्हणाला, 'होय, खरेच ते कठीण नाही! पण मी एकदा 'अ' म्हणालो की, माझ्या मागे 'आ' म्हण म्हणून टुमणे लागणारच! म्हणून माझा निश्चय आहे की उच्चारच करावयाचा नाही. '

तात्पर्य : आळस विद्यार्जनास मारक ठरतो.

## रहमते दर्शन (भाग - १)



वह अपनी सामान्य स्थिति में लौटने लगा। हम भी सो गये। जब सुबह उठे, तो पाया कि बच्चा पूर्ण रूप से स्वस्थ है और उसे कोई बीमारी नहीं है। यह थी महान कृपा उस महापुरुष की हमारे परिवार पर ।

दूसरी घटना मेरे दूसरे पुत्र पंकज के बारे में है। किन्हीं परिस्थितियों में मेरा लड़का बाढ़ में बह गया। यह तो तय था कि उसकी मृत्यु हो गई परन्तु हमें तीन दिन लगातार ढूँढते रहने पर भी उसका शव नहीं मिला। तीसरे दिन मेरे छोटे पुत्र ने बताया कि उसने अपने अन्तर में महाराज दर्शनसिंह जी को देखा। वे पंकज को दोनों हाथों में उठाये हुए थे। सुबह होने पर हमें उसका शव इस प्रकार मिला जैसे वह सोया हुआ हो ।

### प्रारंभिक दिनों की याद

मेरे पिता जी वृद्धावस्था में थे। वे अपने पोते की मृत्यु से अत्यंत दुःखी थे। ब्राह्मण होने के नाते उनके मन में यह डर रहता था कि अकाल मृत्यु के कारण कही उनका पोता किसी नीची योनि में न चला जाये। दूसरा उसका विछोह तो था ही। वे बड़े अधीर और दुःखी रहते थे। हम भी उनके कारण और पंकज की मृत्यु के कारण अत्यंत विचलित थे। एक रात की बात है, पिता जी कुछ सोये हुए थे और कुछ जागे हुए । उन्होंने अन्तर में एक दृश्य देखा। इस दृश्य में उन्हें दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी के दर्शन हुए। साथ में मेरा मृत पुत्र (पंकज) भी था। मेरे पुत्र ने अपने दादा जी से कहा, दादा जी! आप फिक्र न किया करो। मैं यहाँ पर अपने गुरु महाराज के साथ, वहाँ से भी अधि कमज़े में हूँ।

इसके दो दिन पश्चात मेरे पिता जी को फिर वही दृश्य दिखाई दिया। इस प्रकार अब मेरे पिता जी पूर्ण रूप से आश्वस्त हो गये कि उनका पोता सही स्थान पर चला गया है और उसकी सद्गति हो गई है।

एक बार मेरी पत्नी को इन्जैक्शन react (नुकसान) कर गया। उसकी हालत निरंतर बिगड़ती चली गई । उसका इलाज कराया गया परन्तु कोई असर नहीं हुआ। हमारे पड़ौस में एक होम्योपैथिक डॉक्टर है। उनकी भी दवाई की परन्तु कोई लाभ नहीं हुआ ।

अंत में मेरी पत्नी महाराज जी के भरोसे पर बैठ गई, क्योंकि महाराज जी पर उसे बहुत विश्वास था।

डॉक्टर ने मुझे परामर्श दिया कि इस प्रकार भरोसा- वरोसा करने से कुछ नहीं होगा। मामला गंभीर है। किसी बड़े अस्पताल अपनी पत्नी को ले चलो। मेरी पत्नी को महाराज जी पर अत्याधिक विश्वास था, इसलिये वह १४ घंटे तक महाराज जी के आसरे बैठी रही और अंततः दया के महासागर संत दर्शनसिंह जी महाराज जी की दयाधारा प्रवाहित हुई और उन्होंने उसे दर्शन दिये और कहा, फ़िक्र न करो, तुम बिल्कुल ठीक हो जाओगी। इस प्रकार वह अगले दिन पूर्ण रूप से स्वस्थ हो गई। उनकी अपार दया को मैंने बयान किया है :

कुछ ऐसे खालो खद हैं तेरे ए मेरे दर्शन ।
ताजिस्त दिल से शौके तमाशा न जायेगा ।।
सी बुत बनाएगा ख़ुदा बेशक़ नये नये ।
लेकिन कोई भी तुमसा तराशा न जायेगा ।।

एक और शेर है :

तेरे करम से कौन सी शैमिली नहीं।
झोली ही मेरी तंग थी,
तेरे यहाँ कमी नहीं ।।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

अचार, चटनी, पापड़ इत्यादि देखते ही मुंह में पानी आने लगता है। सुगंधित मसालों वाला भोजन अच्छा लगता है। इस आदत से बचने के लिये जो भी पदार्थ की लपक पैदा होती है उसका विपरीत सात्विक पदार्थ मन में देखा करें। मिर्च खाने की इच्छा हो तो सोचे केले खाऊंगा। इमली खाने की इच्छा हो तो सोचें मुनक्का या किशमिश खाऊंगा। तीखा नमक खाने की इच्छा हो तो सोचो चीनी या गुड़ खाऊंगा। बस उस विपरीत वस्तु को मन में देखते रहें।

जब ये चक्र विकृत होता है वह लोग पास्ट से लगाव बहुत रखते हैं। हम ने यह दु:ख, वह मुसीबत, फलाना जुल्म, फलानी बदतमीजी सहन की आदि आदि वर्णन करते रहेंगे। ऐसे लोग दिल हाथ पर ले कर चलते हैं। कोई भी मिला उस के आगे अपने दुखडे बखान करने लगते हैं। ये ज्ञान की कमी के कारण होता है। इस आदत से बचने के लिये थोड़ी थोड़ी देर बाद एक लाईनें, एक पहरा, एक पेज या ज्यादा, कोई न कोई अच्छी पुस्तक या अव्यक्त मुरली की बुक पढ़ा करें।

### स्वाधिष्ठान चक्र

जब स्वाधिष्टान चक्र कमजोर होता है तो ध्यान बार बार भटकता है। अक्सर व्यक्ति दुविधा में रहता है। चीजें देर से समझ में आती है। ऐसे व्यक्ति योग में नहीं बैठ सकते। सेवा के कार्य चाहे कितने करवा लो कोई थकावट नहीं होती। योग में बैठते ही नींद आने लगती है। ऐसे व्यक्ति इस चक्र पर ध्यान लगायें तथा कोई भी व्यक्ति देखे उस के भी इसी चक्र पर तरंगे दें।

यह चक्र विकृत होने पर इस के लक्षण शरीर पर भी दिखने लगते हैं। उसे अलेर्जी, शरीर पर दाने और खुजली होने लगती है। उसे सुनने में दिक्कत आने लगती है। अक्सर गला खराब रहता है। सर्दी जुकाम की समस्या बढ़ जाती है। किसी खास सुगंध से अलेर्जी होने लगती है। सूंघने की शक्ति खत्म होने लगती है तथा दांत समय से पहले टूटने लगते हैं। ऐसी स्थिति में व्यक्ति को एक तो अच्छे डाक्टर से इलाज करवाना है। क्योंकि इन रोगो के और भी कारण हो सकते हैं। उसे हरी सब्जियों का ज्यादा प्रयोग करना चाहिये और ध्यान का ज्यादा अभ्यास इसी चक्र पर करना चाहिये। सदा सोचते रहो मैं ठीक हो रहा हूं। जब यह चक्र कमजोर होता है तो उन लोगो का गणित,

अकाउंट, इकनोमिकस तथा स्टेटिसटिक्स के विषय कमजोर होते हैं। ऐसे लोगो को उत्साह बढ़ाने वाली किसी पुस्तक के लगभग १-२ पेज हर रोज पढ़ने चाहिये। जब यह चक्र दूषित होता है तो मन में घबराहट तथा मन में तरह तरह की शंका होने लगती है व्यक्ति में आत्मा हत्या के विचार आने लगते हैं। व्यक्ति बहुत जल्दी छोटी छोटी बातो पर परेशान होने लगता है। उसे लगता है सारा संसार ही धोखेबाज है। ऐसी स्थिति में याद रखो एक व्यक्ति या दो व्यक्ति धोखेबाज हो सकते हैं सारा संसार ऐसा नहीं हो सकता।

मन में बार बार दोहराते रहें भगवान मेरी जिंदगी में अच्छे व्यक्ति लाओ। मुझे अच्छे आइडियाज दो। विपरीत परिस्थिति में भी सोचते रहो इस में भी कोई कल्याण है। अच्छी पुस्तकें पढ़ा करो अच्छा संगीत सुनो। प्रेरणाप्रद प्रवचन सुनते रहो। भगवान या ईष्ट को याद करो। अगर याद नहीं आता तो उसका फोटो देखते रहो और विचार दोहराते रहो भगवान मेरे साथ हैं।

सदा याद रखो जब हालात काबू से बाहर हो तो उन्हे भगवान ही ठीक करता है। कोई भी कुछ समस्या आती है तो हम कुछ ना कुछ मन में फैसला करते हैं। अपना आखिरी फैसला बदलो मैं हारूगां के बजाय सोचो जीत मेरी होगी। मन में आयेगा मरूगां उसे बदलो और सोचो मै जीऊगां ।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदीय बालसंस्कार

**काजळ :** घरी तयार केलेले साजूक तुपातील काजळ बाळास लावावे. काजळामुळे बाळाची दृष्टी चांगली होण्यास मदत होते.

**बाळाचे दात :** बाळाच्या जन्मानंतर त्याच्या आरोग्याच्या दृष्टीने दात उगवण्याचा काळ हा सर्वात जास्त त्रासदायक असतो. आयुर्वेदामध्ये दंतउत्पत्तीमध्ये अस्थी व मज्जा या दोन धातूंचा मुख्य सहभाग सांगितलेला आहे. तसेच दंतउत्पत्ती होत असताना, बाळाला लालस्त्राव (लाळ गळणे), हिरड्या सळसळणे, सुजणे व त्या ठिकाणी दंशवत वेदना होणे, ही लक्षणे दिसतात.

**बाळामधील दंतउत्पत्ती :** बाळामध्ये दुधाचे दात जन्मानंतर साधारणत: ५ ते १० महिन्यांपर्यंत येत असतात. त्यांची संख्या २० असते. अस्थी व मज्जा या दोन धातूंवर दंतउत्पत्ती अवलंबून असते. बाळाचे हे दोन धातू जर उत्तम, सारवान, बलवर्धक असतील, तर बाळाला दात उगवताना त्रास होत नाही.

दातांच्या मुळाशी असणारा वायू प्रकुपित होऊन हिरड्यांमध्ये सूज निर्माण करतो, त्यामुळे विविध दंतोद्भवज व्याधी निर्माण होतात. अशा अवस्थेमध्ये बाळ तोंडामध्ये कोणतीही वस्तू घालून चावते. अशा वेळी ती वस्तू बाळ गिळणार नाही ना, याची काळजी घ्यावी.

### नवजात बाळाची काळजी कशी घ्यावी?

तोंडात धरलेली वस्तू दूषित असेल, तर बाळाला ताप, सरदी, खोकला, उलटी, जुलाब ही लक्षणे दिसू शकतात. अशा वेळी जे लक्षण उत्पन्न झालेले असेल, त्या लक्षणावरील उपचार करावा. दंतोद्भवज व्याधींवर उपाय करण्यासाठी बालगुटीतील अतिविषा, मुरुडशेंग, बाळहिरडा या औषधींचा वापर करावा. बाळाला नियमितपणे बालगुटी दिली, तर दंतोद्वज व्याधींचा त्रास कमी प्रमाणात होतो. तसेच अस्थिधातू सारवान होण्यासाठी बाळाला कॅल्शियमचे औषध सुरू करावे. तसेच बाळ तोंडामध्ये दूषित वस्तू घालत नाही ना, याकडे लक्ष द्यावे. बाळाच्या हिरड्यांना सूज असेल, तर त्रिफळा चूर्ण हिरडीला चोळावे, यामुळे बाळाला निश्चितच लाभ होईल. तसेच बाळाला तोंडामध्ये चावण्यासाठी लांब आकाराची मोठी खारीक चघळण्यास द्यावी. फक्त ती बाळ गिळणार नाही ना, याची हे पहावे.

सहा महिन्यांचे बाळ बाहुली, चेंडू, खुळखुळा इत्यादी खेळणी हातात धरायला शिकते. हातात धरल्यानंतर त्या खेळण्याकडे एकटक पाहणे व खेळणी चोखणे इत्यादी क्रिया बालक करते. बाळाच्या हातातून खेळणी घेतली, तर बाळ रडायला लागते. एक वर्षाच्या बाळाला आईची साडी, ओढणी यांबरोबर खेळण्यास आनंद वाटतो. जसजसे बाळ वयाने मोठे होते, तसतशी त्याची खेळणी व खेळ यांमध्ये विविधता येते.

दीड ते दोन वर्षांची मुलगी बाहुली, प्राणी, पक्षी अशा खेळण्यांबरोबर जास्त खेळते. मुलगा विमान, मोटारगाडी, चेंडी याबरोबर खेळतो. दोन ते तीन वर्षांच्या बाळाला पेन्सिल, पेन, रंगखडू यांचे आकर्षण असते. भिंतीवर, पानावर, फरशीवर रेघोट्या मारणे व परत पुसणे व परत रेघोट्या मारणे त्याला आवडते. वेगवेगळी खेळणी खेळता खेळता तोडणे; सायकल, गाड्यांची चाके वेगवेगळी करणे हे नुकसानकारक जरी असल, तरी ते बाळाच्या मानसिक व बौद्धिक विकासासाठी महत्त्वाचे असते. खेळता खेळता वस्तूंची मोडतोड करणे, ही एक नैसर्गिक वृत्ती आहे. 'खंडणामधून नवनिर्माण' या सिद्धान्ताद्वारे आपले बाळ पुढील आयुष्यात यातून काहीतरी नवीन वस्तू निर्माण करण्यास शिकेल.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# खेळामुळे संघभावना, नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत

## उद्योजक नरेंद्र फिरोदिया

नगर – खेळामुळे संघभावना, नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते. संघटन हीच सामाजिक शक्ती आहे. त्याचा योग्य वापर करता आला पाहिजे. खेळातून सामाजिक संघटन कसे साधावे याचे ज्ञान मिळते. स्व. राहुल पितळे हे जॉईसच्या स्थापनेपासून सक्रिय सदस्य होते. त्यांच्या स्मरणार्थ ही स्पर्धा झाली. अहमदनगर ओसवाल पंचायत सभा व जैन ओसवाल युवक संघाने स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन केले, असे प्रतिपादन जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.







सोहम चषक क्रिकेट स्पर्धेत पुरुष गटात मुनोत सुपरकिंग्स, महिला गटात मिस मॅच क्विन्स तर लहान मुलांच्या गटात कॉन्प्लेक्स हिरोज संघ अजिंक्य ठरला.

### पुरुष गटात मुनोत सुपरकिंग्स, महिला गटात मिस मॅच क्विन्स तर लहान मुलांच्या गटात कॉन्प्लेक्स हिरोज संघ अजिंक्य

अहमदनगर ओसवाल पंचायत सभा व जैन ओसवाल युवक संघ (JOYS) तर्फे नगर क्लबच्या मैदानावर १३ ते २० एप्रिल या कालावधीत सोहम चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण प्रसंगी ते बोलत होते. ही स्पर्धा पुरुष, महिला व लहान मुले अशा तीन गटांत खेळविण्यात आली. या स्पर्धेतील पुरुष गटातील अंतिम सामन्यात मुनोत सुपरकिंग्स संघाने ३४ धावांनी सामना जिंकत सोहम चषक पटकावला. महिला गटात मिस मॅच क्विन्स तर लहान मुलांच्या गटात कॉन्प्लेक्स हिरोज संघ अजिंक्य ठरला.

पारितोषिक वितरण उद्योजक नरेंद्र फिरोदिया, उद्योजक विक्रम फिरोदिया, जैन ओसवाल पंचायत सभेचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र खोखो असोसिएशनचे उपाध्यक्ष सीए अशोक पितळे, राखी पितळे, गौरव पितळे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी जैन ओसवाल पंचायत सभेचे सहसचिव संतोष गांधी, पतसंस्थेचे संचालक चेतन भंडारी, जॉईजचे अध्यक्ष प्रतीक बाबेल, सचिव सचिन मुनोत, चेतन बोगावत, प्रमोद (नेवासकर) मुनोत, संजय मुनोत, सीए अजय मुथा, सुवेंद्र गांधी, निधीश पितळे, सोहम फिरोदिया, अनुष्का फिरोदिया, करुणा मुनोत, प्रणिल मुनोत, परेश गांधी, किरण पितळे, आदित्य गांधी, जय भंडारी, पवन गुंदेचा, ऋषभ कटारिया उपस्थित होते.

सीए अशोक पितळे म्हणाले की, क्रेझी क्रिकेट स्पर्धा आयोजित करून अतिशय स्तुत्य उपक्रम राबविला आहे. या स्पर्धेत सर्व खेळाडूंनी खेळाचा आनंद घ्यावा म्हणून एकत्र येत, आपुलकीचा संवाद घडण्यास मदत होईल. एकमेकांचा परिचय होईल, नवीन मैत्री स्नेहबंध जुळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अंतिम सामना मुनोत सुपरकिंग्स व किंग्स ऑफ हेवन या संघांत २० एप्रिलला झाला. ११ षटकांच्या सामन्यात मुनोत सुपरकिंग्स संघाने प्रथम फलंदाजी करत ५ गडी गमावत ११८ धावा जमवल्या. निखिल सावजने सर्वाधिक २० धावा केल्या. तर स्वरुप गांधीने १८, रोहित पिपाडाने १६, देव भंडारीने १६ धावा जमवल्या. किंग्स ऑफ हेवनकडून संभव कासवा, वेदांत पटवा, कर्णधार श्रेणिक मुनोत व वंश फिरोदियाने प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

विजयासाठी ११९ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात आलेल्या किंग्स ऑफ हेवनचे फलंदाज मुनोत सुपरकिंग्सच्या भेदकमाऱ्या समोर टिकाव धरू शकले नाहीत. किंग्स ऑफ हेवनचे फलंदाज क्रमाक्रमाने बाद होत राहिले. किंग्स ऑफ हेवेनकडून आशिष भंडारी (१० धावा), नक्षत्र शिंगी (नाबाद १६ धावा) व यश मुथा (११ धावा) यांनी लढत देण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश खेचून आणता आले नाही. अखेर किंग्स ऑफ हेवनचा संपूर्ण संघ ९.४ षटकांत सर्व गडी गमावत ८४ धावाच जमवू शकला. मुनोत सुपरकिंग्सकडून देव भंडारी व रोहित पिपाडाने प्रत्येकी दोन तर तेजस गुंदेचा, निखिल गुगळे, ऋतिक मुनोत व कर्णधार संकेत गांधीने प्रत्येकी एक फलंदाज बाद केला. पुरुषांच्या अंतिम सामन्यात रोहित पिपाडा (मुनोत सुपरकिंग्स) सामन्याचा मानकरी, तिर्थेश कटारिया सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक, कुशल मुनोत सर्वोत्कृष्ट फलंदाज तर देवेश गुगळे सर्वोत्कृष्ट गोलंदाज ठरला. ओजस बोरा मालिकावीर ठरला.

महिलांच्या गटात मिस मॅच क्विन्स विरुद्ध सैफरॉन हिल्स गुगळे हाय फ्लायर्स या संघांत अंतिम सामना झाला. मिस मॅच क्विन्स अजिंक्य ठरले. नुतन गुंदेचा सामनावीर, रोशनी भंडारी सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक, सोनल गुगळे सर्वोत्कृष्ट फलंदाज, सिद्धी बोरा सर्वोत्कृष्ट गोलंदाज, दर्शना काठेड मालिकावीर ठरल्या.

लहान मुलांच्या गटात कुशल वॉरियर्स विरुद्ध कॉन्प्लेक्स हिरोज या संघांत अंतिम सामना झाला. कॉन्प्लेक्स हिरोज विजयी झाले. प्रीत गुगळे सामनावीर, अरूष शिंगवी सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक, ईशान गांधी सर्वोत्कृष्ट फलंदाज, क्रिशय बोरा सर्वोत्कृष्ट गोलंदाज तर प्रीत गुगळे मालिकावीर ठरला.



## भारतीय कामगार सेना सहचिटणीसपदी मधुकर निकम यांची निवड

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रणित भारतीय कामगार सेनेच्या (बीकेएस) सहचिटणीस पदी मधुकर नामदेव निकम यांची निवड झाली आहे. बँक ऑफ इंडियाच्या प्रोबेशनरी अधिकारी पदी हर्षदा मोहन पांढरे यांची निवड झाली आहे. याबद्दल शहर प्रमुख किरण काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हा उपप्रमुख रावजी नांगरे यांच्या पुढाकारातून प्रभाग क्र.१ येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अल्पसंख्यांक काँग्रेस आघाडीचे शहर जिल्हाध्यक्ष अनिस चूडीवाला, विलास उबाळे, मोहन पांढरे, कल्पना पांढरे, किशोर कोतकर, आकाश आल्हाट, विकास भिंगारदिवे, आनंद जवंजाळ आदी उपस्थित होते.

# सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास खेळ ही करिअर करण्याची उत्तम संधी

### आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन; शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या खेळाडूंचा सन्मान

नगर – सध्या सोशल मिडीयामुळे युवा पिढी भरकटलेली आहे. मात्र युवा पिढीने खेळाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिल्यास खेळ ही करिअर करण्याची चांगली संधी आहे. अविरत कष्ट व जिद्दीच्या जोरावर तुम्ही यशाला गवसणी घालू शकता, असे प्रतिपादन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.



महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळालेल्या जिल्ह्यातील खेळाडूंचा जिल्हा हौशी कबड्डी संघटनेच्या वतीने सन्मान करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे, पोलिस उपअधीक्षक संपतराव भोसले व संघटनेचे पदाधिकारी.

जिल्हा हौशी कबड्डी संघटनेच्या वतीने राज्य सरकारचा शिवछत्रपती क्रिडापुरस्कार मिळालेले खेळाडू शंकर गदई, असलम इनामदार, डॉ. शुभांगी रोकडे, कोमल वाकळे यांचा तसेच राज्य कबड्डी अजिंक्यपद स्पर्धेत उपविजेता ठरलेल्या नगर जिल्हा कबड्डी संघाचा नगरमध्ये गौरव करण्यात आला. अध्यक्षस्थानी संघटनेचे उपाध्यक्ष जयंत वाघ होते. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, उपविभागीय पोलिस अधिकारी संपतराव भोसले, जिल्हा क्रिडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, माजी क्रिडा अधिकारी अजय पवार, सुधीर चपळगावकर, संघटनेचे सचिव प्रा. शशिकांत गाडे आदि उपस्थीत होते.

यावेळी डांगे यांनी नगरमधील मिस्कीनमळा व सारसनगर येथे क्रिडां संकुल उभारण्यात येत असल्याची माहिती दिली. कबड्डी संघटनेचे सचिव प्रा.शशिकांत गाडे यांनी नव्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे व नगर जिल्ह्याचे कबड्डी वैभव वाढावे यासाठी हा गौरव समारंभाचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती दिली. तसेच प्रो कबड्डी खेळण्यात सर्वात जास्त खेळाडू नगरचे होते. यापुढे नगरचा संघ अजिंक्यपद पटकवेल असा दावा केला. स्वागत कैलास पठारे यांनी तर आभार संघटनेचे उपाध्यक्ष जयंत वाघ यांनी मानले. यावेळी विजयसिंह मिस्कीन, प्रा.पोपट कडुस, प्रा. गोविंद भुजबळ, बाळासाहेब कडुस, सुधाकर सुंबे, शंतनु पांडव, प्रा. संजय साठे, प्राचार्य सोपान काळे, बाबासाहेब गुंजाळ, संपतराव म्हस्के, दत्तात्रय वाकचौरे, विनायक भुतकर तसेच खेळाडू व क्रिडाप्रेमी उपस्थित होते.

# डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीतील यांत्रिकी विभागात 'मॅटलॅब अ‍ॅण्ड सिमूलिंक' या विषयावर कार्यशाळा

नगर – विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यंत्र अभियांत्रिकी विभागात नुकतीच 'मॅटलॅब अ‍ॅण्ड सिमूलिंक' विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मॅटलॅब हे विविध अभियांत्रिकी शाखा जसे की यांत्रिकी अभियांत्रिकी, रोबोटिक्समधील संशोधक आणि अभियंत्यांसाठी एक महत्त्वाचे साधन आहे. ते एकात्मिक सॉफ्टवेअर वातावरणात डिझाइन आणि फाइन-ट्यून अल्गोरिदम, मॉडेल रिअल-वर्ल्ड सिस्टम आणि ऑटोमेट कोड जनरेशन सुलभ करण्यास मदत करते. मॅट लॅब डेटा, मॅट लॅब विश्लेषण, हाताळणी आणि व्हिज्युअलायझेशनसाठी शक्तिशाली साधने प्रदान करते. ते डेटा क्लीनिंग, फिल्टरिंग, सांख्यिकी, प्लॉटिंग आणि परस्परसंवादी व्हिज्युअलायझेशन तयार करण्यासाठी कार्ये देते. तसेच अल्गोरिथम विकास मॅट लॅब चा वापर अल्गोरिथम विकसित आणि अंमलात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात केला जातो. 'सिम्युलिंक मॉडेलमधून सी किंवा सी++' कोड जनरेट करण्यासाठी सिम्युलिंक कोडर देखील वापरू शकता, जो एम्बेडेड सिस्टम किंवा हार्डवेअर प्लॅटफॉर्मवर तैनात केला जाऊ शकतो. दुसरीकडे, डेटा प्रोसेसिंग, विश्लेषण आणि व्हिज्युअलायझेशन सारख्या इतर कामांसाठी मॅट लॅब कोड जलद आणि अधिक कार्यक्षम असू शकतो.



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीतील यांत्रिकी विभागात 'मॅटलॅब अँड सिमूलिंक' विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून मॅथ वर्क्स इंडियाचे कस्टमर सक्सेस स्पेशालिस्ट हरीश मूर्ती आणि ॲपलिकेशन इंजिनियर डिझाईन टेक सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड पुणेचे रोहित पवार यांचे मार्गदर्शन लाभले. सदरील कार्यशाळेचे आयोजन यांत्रिकी विभागातील द्वितीय तृतीय तसेच अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी केले गेले होते.

यांत्रिकी विभागात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध कार्यशाळा राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद विविध एक्सपर्ट लेक्चरचे आयोजन मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागामार्फत करण्यात येत असते. या कार्यशाळेचा अजेंडा विद्यार्थ्यांना पोर्टल डेमोस्ट्रेशन ऑफ मॅट लॅब स्टुडन्ट प्रोजेक्ट्स प्रोग्रामिंग अँड डाटा विजूलायझेशन मॅथेमॅटिकल मॉडेलिंग अँड सिम्युलेशन फिजिकल मॉडेलिंग अँड सिमुलेशन इव्हेंट बेस्ड मॉडेलिंग हार्डवेअर इंटिग्रेशन अशा विविध टेक्निकल बाबींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि ट्रेनिंग देण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले होते.

हरीश मूर्ती यांनी मार्गदर्शन केले तर रोहित पवार दोन दिवसांत चार सत्राच्या माध्यमातून प्रत्यक्ष ट्रेनिंग द्वारे विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त हँडस ऑन एक्सपिरीयन्स कसा मिळेल हे पाहिले. कार्यशाळेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी हरीश मुर्ती, रोहित पवार यांचेशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करून समाधानकारक उत्तरे दिली.

कार्यशाळेसाठी डॉ. विखे पाटील फाउंडेशनचे सेक्रेटरी डॉ. पी.एम.गायकवाड, संचालक तांत्रिक प्रा.सुनील कल्हापुरे व अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ.उदय नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. यंत्र अभियांत्रिकीचे विभाग प्रमुख डॉ. रवींद्र नवथर यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि मॅटलॅब अँड सिमूलिंक या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच या विषयाचे अभियांत्रिकीतील महत्त्व विशद करुन या कार्यशाळेमध्ये सहभागी शिक्षक, विद्यार्थ्यांचे आभार मानले. कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्रा.डॉ.प्रशांत नरवडे, प्रा.डॉ. कानिफ मरकड, प्रा. डॉ.सुशील मगर यांनी प्रयत्न केले. संस्थेचे चेअरमन राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील यांनी सहभागी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



गर्भगिरी डोंगरातील पानवठ्यात टँकरने पाणी देताना जय हिंद फाउंडेशनचे सदस्य.

# गर्भगिरी डोंगरातील पानवठ्यात टँकरने पाणी

### जय हिंद फाउंडेशनचा पशु-पक्षी व प्राण्यांना दिलासा!

नगर – गर्भगिरी डोंगर परिसरातील पशु-पक्ष्यांच्या पाण्याच्या टंचाईपासून वाचविण्यासाठी जय हिंद फाउंडेशनच्या वतीने वन विभागाच्या पानवठ्यात टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करण्यात आली. फाउंडेशनच्या माध्यमातून हा उपक्रम दरवर्षी राबविला जातो. यावर्षी आगडगाव रस्त्यावरील कोल्हार घाट परिसरात, डोंगर व जंगल भागातील ठिकाणी ही पाण्याची सोय करण्यात आली.

या उपक्रमाचा शुभारंभ बोईसर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, अनिल गर्जे, रोहिदास पालवे, ऋषिकेश पालवे, वैभव पालवे, प्रसाद पालवे, मेजर सचिन पालवे, माजी उपसरपंच कारभारी गर्जे, आदेश पालवे, अनिल ससे यांच्यासह आजी-माजी सैनिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

भानुदास पालवे म्हणाले की, फाउंडेशनचे कार्य हे निसर्ग संवर्धनाच्या दिशेने प्रेरणादायी आहे. त्यांचे वृक्षारोपण व संवर्धनाचे कार्य समाजासाठी मार्गदर्शक ठरत आहेत. उन्हाळ्यात जंगलातील पशु-पक्ष्यांना पाण्याची टंचाई भासत असते. त्यामुळे हे पाणवठे त्यांच्या जगण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. जंगलातील पर्यावरणाचा समतोल राखण्यासही अशा उपक्रमांचा मोठा फायदा होतो.

शिवाजी पालवे म्हणाले की, निसर्ग रक्षण ही केवळ शासनाची नव्हे, तर प्रत्येकाची जबाबदारी आहे. जय हिंद फाउंडेशनच्या या उपक्रमातून समाजात पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होऊन भावी पिढीला निसर्गसंपन्न जीवनशैलीची प्रेरणा मिळेल. पशु-पक्ष्यांना पाण्याअभावी मृत्यू ओढवू नये, यासाठी आम्ही दरवर्षी हे अभियान राबवतो. प्रत्येकाने आपल्या घरी, अंगणात किंवा टेरेसवर पक्ष्यांसाठी पाणी आणि धान्य ठेवावे. यामार्फत आपणही या निसर्ग चळवळीचा भाग होऊ शकतो. तसेच, आपल्या कुटुंबातील सदस्यांच्या वाढदिवस किंवा स्मृतिदिनानिमित्त जर कोणी पाण्याची सोय करु इच्छित असेल, तर त्यांनी फाउंडेशनशी संपर्क साधण्याचे आवाहन करुन, गरज पडल्यास अधिक टँकरद्वारे पाणीपुरवठ्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

मेजर सचिन पालवे यांनी सर्वांचे आभार मानत पुढील टप्प्यात अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.



जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकवणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने दोन वेळा महिला वर्ल्ड रॅपिड चेस चॅम्पियन बुद्धिबळ ग्रँडमास्टर कोनेरू हंपी यांची भेट घेऊन बी के डॉ. दीपक हरके व प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी दीदी यांनी ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली. यावेळी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या सूस सेवाकेंद्राच्या संचालिका बी के आशा दीदी व मिस इंडिया एक्सक्विसिट अमेरिका विजेती, माईलस्टोन इंटरनॅशनल प्रिन्सेस मॉस्को, रशिया विजेती, ग्लोबल इंटरनॅशनल प्रिन्सेस पटाया, थायलंड विजेती व मिस ब्यूटी टॉप ऑफ द वर्ल्ड लॅटीवा, युरोप विजेती ब्यूटी क्वीन बी के डॉ. ईशा अगरवाल उपस्थित होते.

# स्कॉलर्स हब इंटरनॅशनल स्कूलमध्ये निकाल वितरण व 'युकेजी ग्रॅज्युएशन डे'

नगर – स्कॉलर्स हब इंटरनॅशनल स्कूल, अ.नगर येथे २१ एप्रिल रोजी वार्षिक निकाल वितरण आणि 'UKG ग्रॅज्युएशन डे' समारंभ उत्साही वातावरणात पार पडला. या प्रसंगी पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शिक्षकांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी 'UKG' विभागातील विद्यार्थ्यांना पदवीप्राप्तीबद्दल शुभेच्छा दिल्या आणि पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी संदेश दिला. या समारंभाचे विशेष आकर्षण ठरली 'UKG' वर्गातील विद्यार्थिनी झैनब तांबोळी हिची इंग्रजीतून सादर केलेली कृतज्ञतापूर्वक भाषण सादरीकरण, ज्याला उपस्थित पालक व शिक्षकांनी भरभरून दाद दिली.

यानंतर शाळेचे व्यवस्थापकीय संचालक राहील शेख आणि मुख्याध्यापिका सौ. फौजिया शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले.

मुख्याध्यापिका सौ. फौजिया शेख यांनी सुरुवातीच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत शाळेच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ॲक्टिव्हिटीबेस्ड अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जात असल्याचे नमूद केले. तसेच, शाळेच्या कार्यपद्धतीबाबत समाधान व्यक्त करत शिक्षकवर्गाच्या समर्पित सेवाभावाचे विशेष कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्हे आणि खास भेटवस्तू देण्यात आल्या.

शाळेच्या ध्येयवाक्यानुसार – To make leaders, not the followers, संस्थेचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम बनवणे हा आहे. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी पालकांनी शाळेच्या शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे कौतुक केले आणि शिक्षक वर्गाचे आभार मानले.




स्कॉलर्स हब इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'युकेजी ग्रॅज्युएशन डे' उत्साहात साजरा करण्यात आला.


ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र आयोजित अहिल्यानगर जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती वितरण व कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान सोहळा झाला. (छाया – लहू दळवी)

# बालवयातच विद्यार्थ्यांनी शालेय स्पर्धात्मक परीक्षेमध्ये भाग घेऊन आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी : हभप अशोक महाराज भोसले

## ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र आयोजित जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती वितरण व कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान सोहळा

नगर – जीवन जगत असताना मनुष्या जवळ ध्येय असावे, आणि ते बाल वयातच बाळगुण जिद्द, चिकाटी व मेहनतीच्या जोरावर पूर्ण करावी. बाल वयातच विद्यार्थ्यांनी शालेय स्पर्धात्मक परीक्षेमध्ये भाग घेऊन आपल्या करिअर कडे वाटचाल करावी. ध्येय एज्युकेशन फाउंडेशनच्या माध्यमातून एमपीएससी यूपीएससी परीक्षेच्या धरतीवर स्पर्धात्मक परीक्षेचे शिक्षण दिले जाते ही बाब कौतुकास्पद आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थी घडला जातो. पालकांनीदेखील शालेय शिक्षणाबरोबर आपल्या पाल्याला संस्कृतीचे देखील धडे द्यावे असे प्रतिपादन हभप अशोक महाराज भोसले यांनी केले.

ध्येय एज्युकेशन फाउंडेशन महाराष्ट्र आयोजित अहिल्यानगर जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती वितरण व कर्तव्यदक्ष अधिकारी सन्मान सोहळा झाला. यावेळी हभप अशोक महाराज भोसले, उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे, माजी नगरसेवक नितीन शेलार, सुदाम शेंडगे, अर्चना शेंडगे, संदीप पाटील, सोमनाथ शिंदे, संस्कार शेंडगे, निलेश विटेकर, गणेश बोरुडे, कपिल कांबळे, सदानंद रोकडे, निलेश बागडे, शितल विटेकर, आयुष परदेशी, आदित्य खेचरे आदींसह पालक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.


नितीन शेलार म्हणाले की आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाला खूप महत्त्व प्राप्त झाले असून शालेय शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्राला ही तितकेच महत्त्व आहे. त्यामध्ये देखील विद्यार्थ्याला करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे. ध्येय एज्युकेशन फाउंडेशन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची सवय लावण्याचे काम करत आहे असे ते म्हणाले.

संदीप पाटील म्हणाले की, प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्र राज्य हे देशात अव्वल स्थानावर घेऊन जाण्याचे काम आपल्याला करायचे आहे. यासाठी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून देण्यासाठी ध्येय फाउंडेशन वर्षभर विविध स्पर्धेचे आयोजन करत असतात. एमपीएससी यूपीएससी परीक्षेचे ध्येय ठरवून देऊन त्यांना मार्गदर्शन केले जाते. भविष्य काळात विद्यार्थ्यांना नक्कीच यश मिळेल. प्रशासकीय सेवेची पूर्वतयारी म्हणून राज्यभरपरीक्षेचे आयोजन केले जाते यामध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होत असतात असे ते म्हणाले.

सोमनाथ शिंदे म्हणाले की, फाउंडेशनच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्हास्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेचे पारितोषिक वितरण करण्यात आले असून सुमारे ८०० विद्यार्थीनी सहभागी झाले होते. प्रशासकीय सेवेतील कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा सन्मान या विद्यार्थ्यांसमोर केला जातो, या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा ऊर्जा मिळत असून ते या वयातच एमपीएससी यूपीएससी परीक्षेचे ध्येय बाळगत असतात. महाराष्ट्र राज्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एमपीएससी यूपीएससी परीक्षेकडे वळावे यासाठी फाउंडेशन काम करत आहे.

महाराष्ट्र शासन जिल्हा परिषद शाळेच्या माध्यमातून वर्षभर विविध शैक्षणिक स्पर्धा आयोजित करत असतात. ध्येय एज्युकेशन फाउंडेशन ही अशा प्रकारच्या स्पर्धा घेत असून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी एक हक्काचे व्यासपीठ निर्माण करून देत आहे. या पद्धतीच्या परीक्षा जिल्हा परिषद शाळेमध्ये घेण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करू असे मत उपशिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे यांनी व्यक्त केले.

# रॉयल कॉलेज ऑफ रेडिओलॉजिस्टची (युके) नगर येथील डॉ. सादर शेख यांना फेलोशिप



नगर – येथील रेडिओलॉजिस्ट डॉ. साद शेख (एमबीबीएस, एमडी–रेडिओडायग्नोसिस) यांना युनायटेड किंगडमच्या रॉयल कॉलेज ऑफ रेडिओलॉजिस्ट्सची (FRCR) फेलोशिप मिळाली. रेडिओलॉजी आणि डायग्नोस्टिक इमेजिंग क्षेत्रातील ही पदवी सर्वात प्रतिष्ठित आणि जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त मानली जाते.

डॉ. शेख यांची वैद्यकीय वाटचाल त्यांच्या अथक परिश्रमांची, शैक्षणिक उजळणीची आणि वैद्यकीय प्रगतीसाठी असलेल्या उत्कटतेची साक्ष आहे. त्यांनी एमबीबीएस विशेष गुणवत्तेसह पूर्ण केल्यानंतर रेडिओलॉजीमध्ये विशेष शिक्षण घेतले आणि आजवर अचूक निदान क्षमतेसाठी आणि वैद्यकीय सेवेसाठी उल्लेखनीय ओळख त्यांनी निर्माण केली आहे.

फेलोशिपव्यतिरिक्त, डॉ. साद शेख यांना मस्क्युलोस्केलेटल रेडिओलॉजीमध्येही फेलोशिप प्राप्त झाली आहे. ते सध्या डॉक्टरेटचा अभ्यासक्रम पूर्ण करीत असून, रेडिओलॉजिकल विज्ञानात संशोधन आणि नाविन्य यासाठी त्यांची बांधिलकी अधोरेखित करीत आहेत.

रॉयल कॉलेज ऑफ रेडिओलॉजिस्ट्स (RCR) हे युनायटेड किंगडममधील एक जागतिक दर्जाचे व्यावसायिक संस्थान आहे, जे क्लिनिकल रेडिओलॉजी आणि ऑन्कोलॉजी या क्षेत्रात प्रगतीसाठी कार्यरत आहे. संपूर्ण जगभरात हजारो सदस्य असलेल्या या संस्थेचा उद्देश शिक्षण, संशोधन आणि उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवांच्या माध्यमातून आरोग्य क्षेत्राला दिशा देणे आहे.

FRCR पदवी ही RCR कडून दिली जाते आणि ती उत्कृष्टतेचे आणि व्यावसायिक कौशल्याचे प्रतिक मानली जाते. ही पदवी मिळवण्यासाठी कठोर परीक्षा प्रक्रिया पार करावी लागते, जी केवळ तांत्रिक ज्ञानच नव्हे तर वैद्यकीय निर्णय क्षमता आणि रुग्णकेंद्रित सेवांची कसोटी घेते. त्यामुळे FRCR मिळवणारे रेडिओलॉजिस्ट्स जागतिक पातळीवर अत्यंत सक्षम मानले जातात.

RCR ही संस्था रेडिओलॉजी प्रशिक्षण, धोरणनिर्मिती आणि वैद्यकीय सेवा विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे ती इमेजिंग बेस्ड मेडिसिनच्या प्रगतीत एक दिशादर्शक संस्था ठरते.

डॉ. साद शेख यांची FRCR फेलोशिपची प्राप्ती ही केवळ वैयक्तिक यशाचीच नव्हे, तर व्यावसायिकदृष्ट्याही एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. त्यांच्या निष्ठा, चिकाटी आणि जागतिक दर्जाच्या वैद्यकीय सेवा देण्याच्या इच्छाशक्तीचा हा परिपाक आहे. मस्क्युलोस्केलेटल रेडिओलॉजीमधील उप–विशेषज्ञ फेलोशिप आणि डॉक्टरेट स्कॉलर म्हणून असलेली त्यांची शैक्षणिक भूमिका या सर्व गोष्टी त्यांना शैक्षणिक आणि क्लिनिकल रेडिओलॉजीच्या अग्रभागी नेऊन ठेवतात.

# संत निरंकारी मिशनच्या वतीने २४ एप्रिल रोजी मानव एकता दिवस व रक्तदान शिबिराचे आयोजन

## नगर शहरसह देश विदेशात ५०० ठिकाणी अभियान




नगर – सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज व निरंकारी राजपिताजी यांच्या आशीर्वादाने संत निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजी महाराज यांच्या ४५ व्या स्मृति दिनानिमित्त 'मानव एकता दिवस' चे आयोजन करण्यात आले असून २४ एप्रिल रोजी मिस्किन रोड स्थित संत निरंकारी सत्संग भवन येथे सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हास्तरीय रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

तसेच बाबा गुरबचनसिंहजी आणि मिशनचे अनन्य भक्त चाचा प्रतापसिंह यांना श्रद्धा सुमन अर्पित करण्यासाठी मानवाला एकत्वाच्या सूत्रात गुंफणारा मानव एकता दिवस सत्संग कार्यक्रम भवनच्या प्रांगणात सकाळी १० ते १२.३० वाजेपर्यंत होईल व मंडळाच्या देशभरातील शाखांमध्ये तसेच विदेशातही हा दिवस श्रद्धाभावाने साजरा केला जाईल व त्यांच्या महान जीवनातून भक्तगण प्रेरणा घेतील.

रक्तदान शिबिरा विषयी माहिती देताना मंडळाचे नगर झोन प्रमुख हरीष खुबचंदानी यांनी सांगितले की, गेली २८ वर्षापासून नगर शाखेत रक्तदान शिबिर आयोजित केले जात असून मोठ्या श्रद्धेने व उत्साहात येथे भाविक येऊन रक्तदान करतात यात महिलांची संख्याही लक्षणीय असते. त्यांनी पुढे सांगितले की, संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन च्या विद्यमाने त्या दिवशी देश विदेशात सुमारे ५०० पेक्षा अधिक ठिकाणी रक्तदान शिबिराचे अविरत श्रृंखलेचे व्यापक आयोजन केले जाईल. ज्यामध्ये जवळपास ५० हजार पेक्षा अधिक रक्तदाते मानवतेच्या भल्यासाठी रक्तदान करून नि:स्वार्थ सेवेचे उदाहरण प्रस्तुत करतील. बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी सन १९८६ पासून सुरू केलेले रक्तदान अभियानाची ही मोहीम आज महाअभियनाच्या रूपात आपल्या चरम उत्कर्ष बिंदूवर पोहोचली आहे. मागील जवळपास चार दशकांमध्ये आयोजित ८६४४ शिबिरांमध्ये एकत्रित झालेले १४ लाख ५ हजार युनिट रक्त, रक्तपेढ्यांच्या माध्यमातून गरजू रुग्णांसाठी उपलब्ध करून दिले असल्याचे खुबचंदानी यांनी शेवटी सांगितले.

शिबिरात येऊन रक्तदान करण्याचे आवाहन निरंकारी मंडळाच्या वतीने करण्यात आले असून सत्संग प्रवचन कार्यक्रमाचाही भाविकांनी लाभ घ्यावा.


दादा चौधरी विद्यालय नं. १ च्या १९६९चे एस.एस.सी. बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला.


# दादा चौधरी विद्यालय नं.१ च्या १९६९चे एस.एस.सी. बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात

नगर – येथील हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालय नं. १ च्या सन १९६९ चे एस. एस. सी. बॅचमधील सर्व माजी विद्यार्थी सिनिअर सिटीझन यांचे वतीने तिसरा स्नेहसंमेलन मेळावा १८ एप्रिल रोजी नगर–पुणे रोडवरील हॉटेल स्वीटहोम येथे आयोजित करण्यात आला होता.

त्यामध्ये औरंगाबाद, नाशिक, पुणे, अहमदनगर येथील एकूण ४५ विद्यार्थी / सिनिअर सिटीझन यांनी सहभाग घेऊन आपल्या सर्व जुने मित्रांना भेटून एकमेकांच्या आयुष्यातील जुन्या आठवणींना उजाळा दिला. स्नेहसंमेलन पार पाडण्यासाठी अहमदनगर शहरातील राम पर्वते, दिलीपसिंग परदेशी, दिलीप बोरुडे, श्रीकांत खाजगीवाले, नंदु तारे, माजी नगरसेवक दत्तात्रय भागानगरे, हॉटेल सायंताराचे मालक श्रीकांत अष्टेकर, शरद गोडबोले, बाळू पाटील यांचे सहकार्य केले. आनंद स्वीटचे मालक राम पर्वते यांच्यावतीने सर्वांना गिफ्ट देण्यात आले. सर्व सिनिअर सिटीझन यांच्या अविस्मरणिय सहभागाबद्दल ट्रॉफी देण्यात येऊन सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन अ‍ॅड. सुधीर झरकर यांनी केले.

# मेंढपाळांची मुले गिरवतात जर्मन भाषेचे धडे

## शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडून शिक्षक सचिन ठाणगे यांचा गौरव


पारनेर तालुक्यातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेतील जर्मन भाषा उपक्रमाबद्दल शिक्षक सचिन ठाणगे यांचा सन्मान करताना शिक्षणमंत्री दादा भुसे.

नगर – पारनेर तालुक्यातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सचिन ठाणगे यांच्या संकल्पनेतून धोत्रे खुर्द शाळेतील विद्यार्थी जर्मन भाषा शिकून तिचे वाचन आणि लेखन करण्याची आवड जोपासत आहेत. शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना वेगळी वाट शोधता यावी, यासाठी ग्रामीण भागातील मुलांना जर्मन भाषा शिकविण्याच्या संकल्पनेतून भविष्यवेधी बहुभाषीक शिक्षण देण्याचा प्रयत्न या शाळेत होत आहे.

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ आणि इतर देशांमधे त्यांची असणारी कमतरता या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जर्मन देशातील 'बाडेन बुटेनबर्ग' या राज्यात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत नुकताच सामंजस्य करार केला आहे. जर्मन भाषेच्या माध्यमातून परदेशात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, परंतु भाषेचे ज्ञान अवगत नसल्यामुळे अनेक भारतीय मुलांना संधी मिळत नाही.

मुले संख्याचे वाचन व लेखन, स्वतःबद्दल माहिती, आपसात संभाषण या क्रिया जर्मन भाषेत करतात. शालेय अभ्यासाबरोबरच मुले जर्मन भाषेचा अभ्यास आवडीने करत आहेत.

अतिशय दुर्गम भागातील मेंढपाळांच्या मुलांना तंत्रज्ञानाच्या मदतीने जर्मन भाषेचे ज्ञान दिले. त्याबद्दल शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षक सचिन ठाणगे यांचे कौतुक केले.

मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे वेगवेगळ्या भाषा शिकवल्या तर त्यांना अभ्यासाची गोडी निर्माण होते. हा बहुभाषिक प्रकल्प राज्याला दिशादर्शक असल्याचे मत दादा भुसे यांनी व्यक्त केले .

ग्रामीण भागातील तिसरीच्या मुलांनी जर्मन भाषा अवगत करणे ही खूप विशेष बाब आहे, या आगोदरही ठाणगे यांनी मुलांना मोडी लिपीचे ज्ञान दिले आहे, असे उपक्रमशील शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळेत आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे, असे मत जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले.

या उपक्रमाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, गटशिक्षणाधिकारी सिमाताई राणे, लेखाधिकारी रमेश कासार, विस्तार अधिकारी कांतिलाल ढवळे, जयश्री कार्ले, केंद्रप्रमुख उत्तम फंड व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

# चिरंजीवी हनुमंत गीतरामायण कार्यक्रमात अहिल्यानगरीतील माऊली सभागृह रममाण

## प्रसाद शेटे यांनी आयोजित केलेल्या गीतरामायण कार्यक्रमामुळे नगरकर रसिक रामनामात न्हावून निघाले



सावेडी येथील माऊली सभागृहात प्रसाद शेटे यांनी आयोजित केलेल्या गीतरामायण कार्यक्रमामुळे नगरकर रसिक रामनामात न्हावून निघाले.

नगर – कवी बा. भ. बोरकर असे लिहितात की या भाग्यशाली देशात ईश्वरच वारंवार अवतार घेतो असे नाही तर त्याचे चरित्र देखील युग धर्माला अनुकूल असा अवतार घेत असते.

पुणे आकाशवाणी केंद्राचे कल्पक कार्यक्रम अधिकारी सीताकांत लाड, सुबोध शब्दसौष्ठव जात्याच लाभलेले प्रतिभावान कवी, गीतकार ग. दि. माडगूळकर आणि अतिशय शिस्तबद्ध संयमी, शास्त्रीय संगीताची उत्तम जाण असणारे संगीतकार आणि उत्तम गायक स्वरतीर्थ सुधीर फडके अर्थात बाबुजी या त्रयिंच्या हातून घडलेलं गीतरामायण हे याचं मूर्तिमंत उदाहरण आहे. महर्षी वाल्मिकींचं रामायण आधी लिहिलं गेलं आणि मग गायलं गेलं पण हे गीत रामायण गात गातच जन्माला आलं, गात गातच वाढलं आणि गात गातच परिणामाला आलं. गीत रामायण जन्माला येऊन सत्तर वर्ष झाले पण अजूनही गीत रामायणाची गोडी अजिबात ओसरलेली नाही याचाच प्रत्यय नगरकरांना आला. प्रसाद शेटे यांनी आयोजित केलेल्या गीतरामायण कार्यक्रमामुळे नगरकर रसिक रामनामात न्हावून निघाले.

माऊली सभागृहात रामभाव ग्रहण करण्यासाठी आलेल्या अनंत भाविकांच्या उपस्थितीत गीत रामायण सोहळा रंगला. स्वरतीर्थ सुधीर फडके यांच्या आवाजाची जात कुळी लाभलेले प्रसाद शेटे यांच्या संकल्पनेतून आणि यांच्या आवाजातून गीत रामायण सादर झाले. प्रसाद शेटे यांच्या कन्या सौ. श्रद्धा अमित बाजारे आणि नगरमधील सौ. रेणुका संतोष पवार या सह गायिकानी अतिशय मधुर आर्त स्वरात महाराणी कौशल्या आणि सीतेच्या तोंडची गाणी सादर केली.

अतिशय सुंदर सुरेल वाद्यमेळ या कार्यक्रमातून रसिकांनी अनुभवला. हार्मोनियम वर साथ होती आपल्या नगरचे ज्येष्ठ संगीत गुरु मकरंद खरवंडीकर यांची. तबला साथ लाभली ती हर्षद भावे आणि प्रसाद सुवर्णपाठकी यांची. सिंथेसायझर वर साथ केली संगमनेरचे सत्यजित सराफ यांनी बासरीची साथ केली पुण्याचे सचिन वाघमारे यांनी. खास सांगलीहून आलेले धनंजय गाडगीळ यांनी अतिशय सुरेल व्हायोलिनची साथ केली. कुलदीप चव्हाण व अरुण वाघमारे यांनी ताल वाद्याची साथ केली. कुमारी गौरी संतोष पवार आणि रामायणाचार्य गोरक्षनाथ दुतारे महाराज यांनी कोरस साथ केली.

गीत रामायणातील एकूण ५६ गीतांपैकी निवडक १९ गीतांचे सादरीकरण या कार्यक्रमातून झाले. या १९ गीतांमधून अतिशय नेटक्या मोजक्या परिणामकारक शब्दांमध्ये सुरस रामकथा गुंफली ती निवेदिका वीणा दिघे यांनी. हे गीत रामायण ऐकत असताना संपूर्ण रामायण चलचित्राप्रमाणे डोळ्यासमोरून सरकले असा अभिप्राय ऐकणार्या प्रेक्षकांनी दिला. स्वये श्री राम प्रभू ऐकती, कुशलव रामायण गाती या गीतापासून ते गा बाळांनो श्रीरामायण या दोन महत्त्वपूर्ण गाण्यांसह अन्य १७गाणी सादर झाली, ती अशी..........

दशरथा घे हे पायसदान.. राम जन्मला ग सखी.. सावळा ग रामचंद्र.. ज्येष्ठ तुझा पुत्र मला.. आज मी शाप मुक्त झाले.. स्वयंवर झाले सीतेचे.. नको रे जाऊ रामराया.. जेथे राघव तेथे सिता.. नकोस नौके परत फिरू ग .. माता न तु वैरिणी... पराधीन आहे जगती... मज आणून द्या हो हरिण... पेटवी लंका हनुमंत.. सेतू बांधा रे सागरी.. भूवरी रावण वध झाला.. प्रभो मज एकच वर द्यावा.. डोहाळे पुरावा.. इत्यादी..

दीपप्रज्वलन श्रीमती कुमुदिनी बोपर्डीकर, गुरूभगिनी ह.भ. प. कोळी काकी, सांगीतिक गुरू पवन नाईक, धनेश बोगावत, अन्वर भाई आत्तार (राहुरी) आणि प्रायोजक यांचे हस्ते झाले. साउंड, स्क्रीन, कॅमेरा आणि स्टेज याची जबाबदारी राजू ढोरे (शांती ऑडिओ) यांनी पार पाडली आणि स्क्रीन वरील रामायणातील पौराणिक छायाचित्रे आणि जाहिरातीची धुरा किरण गवते यांनी पेलली.

सौ.पूजा प्रसाद, प्रणव प्रसाद, सौ. श्रद्धा प्रणव (सर्व शेटे कुटुंबीय) आणि राजहंस देसाई यांचे योगदान कौतुकास्पद होते. हे सर्व करून घेणारी अदृश्य शक्ती कार्य करत होती हे अनुभूतीपूर्वक दिसून आले.



# अडचण येणार नाही

**मॅच मेकिंग**

माझा प्रियकर भारतीय लष्करात अधिकारी आहे. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये आहोत. पण आता माझ्याच शहरात त्याचं पोस्टिंग होणार आहे. अर्थात यामुळे आम्हाला काही काळ एकत्र घालवता येणार असला तरी सततच्या सहवासामुळे त्याला वाटणारं प्रेम कमी होईल की काय, अशी मला भीती वाटते. त्याला मी आवडेनाशी झाले तर, या विचाराने मी खूप अस्वस्थ झाले आहे. मला मदत करा.

**उत्तर :** गेली आठ वर्षं तुम्ही हे नातं जपलं आहे. तुमच्यात अनोखे बंध तयार झाले आहेत. लाँग डिस्टंस रिलेशनशीपमध्ये एवढा काळ घालवल्यानंतर एकत्र आल्याने काय होईल, अशी भीती अगदी रास्त आहे. तुम्ही एकाच शहरात राहून एकमेकांची स्पेस जपली तर कोणतीही अडचण येणार नाही. नात्यापलीकडचं आयुष्य जपण्यासाठी तुम्ही दोघांनीही एकमेकांना स्पेस आणि वेळ देणं गरजेचं आहे. संवादाचे सर्व मार्ग खुले ठेवा. एकमेकांशी मोकळेपणाने बोला. मनात काहीही ठेऊ नका. एकमेकांवर हक्क गाजवणं, गरजेपेक्षा जास्त काळजी करणं टाळा. यामुळे एकत्र असतानाही तुम्ही नात्यातलं वेगळेपण टिकवून ठेऊ शकाल. तुमचं नातं एकसुरी होणार नाही आणि प्रत्यक्ष सहवासामुळे नात्याचे बंध अधिक घट्ट होतील. त्यामुळे कोणतीही धास्ती न बाळगता या नव्या बदलाला सामोरी जा.

# कारकुनी करणारा न्यायाधीश झाला

**अचिव्हर**

जिद्द, चिकाटी आणि कष्ट करण्याची तयारी असेल तर माणूस असाध्य वाटणारेही साध्य करू शकतो. अशी अनेक उदाहरणे आपल्याला पदोपदी पाहायला मिळतात. वकिलाच्या कार्यालयात कारकुनी करणाऱ्याने अशा कठोर परिश्रम आणि अभ्यासाच्या बळावर न्यायाधीशपदापर्यंत झेप घेतली आहे. अमित साठे असे या तरुणाचे नाव आहे.

भोर येथील या २८ वर्षीय युवकाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या न्यायाधीश आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. त्याने राज्यातील निवड झालेल्या ११४ न्यायाधीशांच्या यादीत ३६ वा क्रमांक मिळवला आहे. त्यामुळे आता अमित दिवाणी न्यायाधीश आणि न्यायदंडाधिकारी म्हणून न्यायदान करणार आहे.

**प्रेरणादायी प्रवास**

अमितचा हा प्रवास अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. अमित भोरमधील एका सामान्य कुटुंबात जन्मला. घराची परिस्थिती बेताची होती. त्याचे शालेय शिक्षण छत्रपती शिवाजी विद्यालयात झाले तर उच्च शिक्षण अनंतराव थोपटे महाविद्यालयात झाले. वडील टपाल खात्यात कार्यरत आहेत. आईच्या प्रेरणेने अमितला शिक्षणाची आवड निर्माण झाली. वाणिज्य शाखेत पदवी घेतल्यानंतर त्याला एलएलबी करायची इच्छा होती. पण घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे त्याला एक वर्षाचा ब्रेक घ्यावा लागला.



**कसा केला अभ्यास?**

या काळात अमितने बँकेत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या अर्जांचे काम केले. त्यानंतर त्याला भोरमधील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. विजय मुकादम यांच्या कार्यालयात कारकुनाची नोकरी मिळाली. या ठिकाणी काम करताना ॲड. मुकादम यांच्या मार्गदर्शनाखाली त्याने एलएलबीला प्रवेश घेतला आणि अभ्यासाला सुरुवात केली. २०२१ मध्ये पुण्यातील यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालयातून त्याने एलएलबीची पदवी मिळवली. त्यानंतर लगेचच दिवाणी न्यायाधीश व न्यायदंडाधिकारी परीक्षेची तयारी सुरू केली. काही कारणांमुळे परीक्षा लांबणीवर पडली तरी अमितने अभ्यास अखंड सुरू ठेवला. तो नियमितपणे अनंतराव थोपटे महाविद्यालयाच्या ग्रंथालयात जाऊन अभ्यास करत असे.

**दोन वर्षांच्या परिश्रमाचे फळ**

अशाप्रकारे सलग दोन वर्षे त्याने अथक परिश्रम घेतले. ॲड. विजय मुकादम व ॲड. अजिंक्य मुकादम यांच्या मार्गदर्शनाखाली अमितने या परीक्षेची जोरदार तयारी केली. यासोबतच पुण्यातील एका खासगी अकादमीत आठवड्यातून एकदा होणाऱ्या व्याख्यानाचाही त्याला लाभ झाला. या सर्व प्रयत्नांमुळेच अमितने पहिल्याच प्रयत्नात हे यश संपादन केले आहे. अमितचा हा संघर्षमय प्रवास निश्चितच अनेक तरुणांना नवी दिशा आणि प्रेरणा देणारा आहे.

# फिरायला जाताय?

**भटकंती**

रोजच्या धावपळीपासून थोडी विश्रांती घेऊ इच्छित असाल तर शांतता, ऐतिहासिक स्थळांची सफर आणि आत्मिक शांतता मिळवण्यासाठी काही ठिकाणांची अवश्य निवड करा. लखनऊहून तीन दिवसांच्या छोट्या आणि संस्मरणीय ट्रिपसाठी खालील सुंदर ठिकाणे उत्तम पर्याय ठरू शकतात.



*** चित्रकूट**

चित्रकूट हे लखनऊपासून सुमारे २३० किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण धार्मिक आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेले आहे. मानले जाते की, भगवान रामाने वनवासातील अनेक वर्षे येथे घालवली. मंदाकिनी नदीच्या काठावर वसलेले हे स्थान अत्यंत शांत आणि पवित्र आहे. येथे सकाळ-संध्याकाळ घाटांवर भव्य आरती होते. परिसरातील हिरवळ आणि जंगलं पर्यटकांना आकर्षित करते. राम घाट हे प्रमुख श्रद्धास्थान मानले जाते. कामदगिरी पर्वताची परिक्रमा करण्याची धार्मिक परंपरा आहे. गुप्त गोदावरी, हनुमान धारा ही महत्त्वाची तीर्थस्थळे आहेत.

*** चंपावत**

चंपावत हे उत्तराखंड राज्यातील एक सुंदर आणि शांत शहर आहे. हे



शहर लखनऊपासून सुमारे ४२० किलो मीटर अंतरावर आहे. तीन दिवसांच्या सहलीसाठी चंपावत हा एक उत्तम पर्याय ठरू शकते. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले हे ठिकाण निसर्गसौंदर्याने नटलेले आहे. येथे प्राचीन मंदिरे आणि घनदाट जंगलांचे सौंदर्य अनुभवता येते. बालेश्वर मंदिर हे चंपावतमधील एक प्रमुख आकर्षण आहे. नानकमत्ता गुरुद्वारा आणि देवी हिंगला मंदिर हीदेखील महत्त्वाची ठिकाणे आहेत. गर्दीपासून दूर, शांतता शोधणाऱ्यांसाठी चंपावत हे एक आदर्श ठिकाण आहे.

*** मिनार**

धौहरा हे लखनऊपासून सुमारे १९० किलोमीटर अंतरावर आहे. हे ठिकाण कटरनियाघाट वन्यजीव अभयारण्यासाठी प्रसिद्ध आहे. जंगल सफारीसाठी हे ठिकाण एक उत्तम पर्याय आहे. येथे शांत आणि निसर्गरम्य वातावरण अनुभवता येते.

*** श्रावस्ती**




श्रावस्ती हे बौद्ध धर्माशी संबंधित एक ऐतिहासिक ठिकाण आहे. ते लखनऊपासून सुमारे १७० किलोमीटर अंतरावर आहे. भगवान बुद्धांनी येथे अनेक वर्षे वास्तव्य करून ध्यान आणि उपदेश दिले होते. शांतता आणि आध्यात्मिक अनुभव मिळवण्यासाठी येथे अनेक पर्यटक येतात.

# परदेशातून वैद्यकीय शिक्षण?

**करिअर ग्रोथ**

बारावीनंतर अनेकांना मेडिकल सायन्स म्हणजे वैद्यकीय शाखेकडे वळायचं असतं. भारतात नीट परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो. पण नीट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लाखोंमध्ये असताना जागा मात्र काही हजार असतात. यामुळे बरेच विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतात. अशा परिस्थितीत परदेशातून वैद्यकीय शिक्षण घेण्याचा एक पर्याय तुमच्याकडे आहे. या पर्यायाची निवड करताना नेमक्या कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावं याविषयी...



* परदेशातलं शिक्षण तुमच्या करीअरला वेगळं वळण देऊ शकतं. तिथले अनुभव तुम्हाला समृद्ध करत असतात. विकसित देशांमधून वैद्यकीय अभ्यासक्रम शिकून आलेल्या विद्यार्थ्यांना विविध विकारांचं चांगलं ज्ञान मिळू शकतं. अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी अवगत होता येतं.

* भारतीय विद्यार्थ्यांना काही देशांमध्ये वैद्यकीय प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागत नाही तर काही ठिकाणी याची तरतूद आहे. अमेरिका, न्यूझीलंड, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, कॅनडा, मलेशियासारख्या देशांमध्ये प्रवेश परीक्षा द्यावी लागते. चीन, जर्मनी, फिलिपाईन्स, नेपाळ, युक्रेन, बांग्लादेश, रशिया, किर्गिझस्तानसारखे देश विद्यार्थ्यांना थेट प्रवेश देतात.

* परदेशात एमबीबीएस करण्याचा विचार असेल तर सर्वात आधी इंटरनेटवरून विविध देशांमधल्या अभ्यासक्रमांची माहिती करून घ्या. तिथली प्रवेशप्रक्रिया समजून घ्या. समुपदेशकाची मदतही घेता येईल.

* परदेशातल्या बऱ्याच संस्था मान्यताप्राप्त नसतात. यामुळे तुमची फसवणूक होऊ शकते. म्हणूनच संस्थेची मान्यता तपासून बघा.

# स्कीन टोननुसार शेरवानी निवडा

**स्मार्ट शॉपिंग**

प्रत्येकाला आपल्या लग्नात वेगळे आणि सुंदर दिसायचे असते. केवळ वधूलाच नाही तर वरालाही लग्नात स्टायलिश दिसावे असे वाटते. अशा परिस्थितीत शेरवानी निवडताना स्कीन टोननुसार रंग निवडला तर अधिक तेजस्वी दिसालच खेरीज लग्नात तुम्ही एकमेकांना पूरक दिसाल. आत्मविश्वास आणि स्टाईलने हा वेश परिधान केल्यास उपस्थितांवर तुमची छाप पडल्याखेरीज राहणार नाही.



**गोऱ्या त्वचेसाठी निवड**

तुमचा स्कीन टोन गोरा असेल तर ब्राइट हिरवा, नेव्ही ब्लू, वाईन, चमकदार जांभळा असे रंग योग्य असतील. त्याच वेळी, वधूच्या त्वचेचा टोनही गोरा असेल तर रुबी, लाल, टोमॅटो लाल, मरून, गडद गुलाबी, सोनेरी, निळा आणि लव्हेंडर असे रंग तिच्या पोशाखासाठी खूप सुंदर दिसतील.

**डस्की स्किन टोनसाठी...**

तुमचा त्वचेचा टोन डस्की असेल तर उबदार आणि किंचित मातकट रंग निवडा. केशरीऐवजी तुम्ही केशरी, पिवळा, लाल, किरमिजी गुलाबी, पीच असे रंग निवडू शकता. रॉयल ब्लू आणि डस्की पिंक कलर मीडियम टोनवर चांगला दिसतो.

**गडद टोनसाठी...**

स्किन टोन गडद असेल आणि शेरवानीमध्ये क्लासी आणि एलिगंट लुक हवा असेल तर तुम्ही चमकदार रंग टाळावेत. जसे की तुम्ही राखाडी, काळा असे रंग परिधान करू शकता. त्याच वेळी वधूने गडद लाल, किरमिजी रंग, नेव्ही ब्लू आणि गडद जांभळा यासारखे थंड आणि अंडरटोन रंग निवडावे. यामुळे त्वचेचा रंग निस्तेज नाही तर चमकणारा दिसतो.

**फॅब्रिकची निवड**

रेशीम आणि मखमलीसारखे फॅब्रिक सर्व त्वचेच्या टोनवर चांगले दिसते. त्यावर स्किन टोननुसार गोल्डन आणि सिल्व्हर ॲक्सेसरीज निवडा. गोऱ्या टोनवर रुपेरी रंग चांगला दिसेल तर डस्की टोनवर सोनेरी किंवा गुलाबी रंग अधिक शोभेल.

# अशा 'टोप्या' घाला

**फॅशन पॅशन**

मित्रांनो, उन्हाळ्यात डोक्यावर टोपी हवीच. या दिवसात मुलांच्या ॲक्सेसरींमध्ये टोपीला खूप महत्त्व असतं. पण टोपी आता साधीसुधी राहिलेली नाही. विविध प्रकारच्या, आकाराच्या फॅन्सी टोप्या ट्रेंडमध्ये आहेत. टोप्यांचे हे वैविध्यपूर्ण प्रकार तुम्हाला गोंधळात टाकू शकतात. मात्र पेहरावानुसार टोपीची निवड करायची आहे हे लक्षात ठेवा. पेहरावाला शोभणारी टोपी असेल तर नो टेन्शन.



बाजारात नजर टाकली तर बेसबॉल कॅप्स, फाईव्ह पॅनल कॅप्स, ड्रायव्हर सीट कॅप्स, ट्रकर्स कॅप अशा कॅप्सच्या भरपूर व्हरायटी पहायला मिळतील. बेसबॉल कॅप्स गेल्या अनेक वर्षांपासून वापरात आहेत. बेसबॉल या खेळामुळे १९०० व्या शतकापासूच या प्रकारच्या कॅप्सना लोकप्रियता मिळाली. त्यामुळे ही कॅप मुलांच्या वॉर्डरोबचा अविभाज्य भाग झाली. या स्टाईलला थोडं ट्विस्ट देऊन डॅड कॅप्स बाजारात आल्या. बेसबॉल कॅपच्या तुलनेत डॅड कॅपच्या पुढच्या भागाची लांबी थोडी कमी असते. एवढाच काय तो या दोहोंमधला फरक.

फाईव्ह पॅनल ही स्केटर्सची आवडती कॅप आहे. पण ती घालण्यासाठी तुम्ही स्केटर असणं गरजेचं नाही. प्लेन टी शर्ट आणि ट्राउझरवर ती शोभून दिसते. बऱ्याच सेलेब्जना ड्रायव्हर स्टाईल कॅप आवडते. ॲथलेटिक लूकसाठी तुम्ही ट्रकर्स कॅप घालू शकता. मग कॅप्समधली एवढी व्हरायटी बघून तुम्ही थक्क झालात ना? आता शॉपिंगला गेल्यावर एखादी ट्रेंडी कॅप नक्की विकत घ्या.

# ...पण धावत राहा

**फिटनेश फंडा**



धावणं हा अगदी साधा, सोपा व्यायाम आहे. प्रत्येक जण आपल्या वेळेनुसार धावतो. कोणी सकाळी लवकर धावायला जातात तर कोणी संध्याकाळ किंवा रात्रीची वेळ निवडतात. अशावेळी धावायची योग्य वेळ कोणती, हा प्रश्न आपल्याला पडतो. प्रत्येक व्यक्ती आपल्या सोयीनुसार पळायला जात असली तरी एका संशोधनानुसार शरीराचं तापमान सर्वोच्च पातळीवर असताना व्यायामाचे सर्वाधिक लाभ होतात. दुपारी चार ते पाच या वेळात शरीराचं तापमान सर्वोच्च पातळीवर पोहोचलेलं असतं. सायंकाळी सात वाजताही शरीराच्या तापमानाने सर्वोच्च पातळी गाठलेली असते. याच कालावधीत लोकांना जास्त ताजंतवानं वाटतं. याच काळात फुफ्फुस आणि स्नायू पूर्ण कार्यक्षमतेने काम करत असतात. अर्थात दुपार आणि संध्याकाळची वेळ धावण्यासाठी योग्य असल्याचे कितीही दावे होत असले तरी तुमच्या दिनक्रमात बसणारी वेळ व्यायामासाठी सर्वोत्तम असते, असं तज्ज्ञ सांगतात.

सकाळच्या वेळेत शरीराचं तामपान नीचांकी पातळीवर असतं. पण सकाळी धावल्यामुळे एकाग्रता वाढायला मदत होते, असं म्हटलं जातं. तसंच यामुळे तुम्ही उत्साही रहाता. मात्र शरीराचं तापमान कमी असल्यामुळे ऊर्जेची पातळीही घसरलेली असते. त्यामुळे सकाळची वेळ व्यायामासाठी योग्य नसल्याचं काही संशोधनांमधून समोर आलं आहे. तसंच या काळात हृदयविकाराचा झटका किंवा स्ट्रोक येण्याची शक्यताही जास्त असल्याने व्यायाम टाळण्याचा सल्ला दिला जातो. सकाळी धावल्याचे खूप चांगले परिणाम दिसत नसले तरी दिवसभर कामावर लक्ष केंद्रित करणं यामुळे शक्य होतं.

दुपारच्या वेळी शरीरात पुरेशी ऊर्जा साठलेली असते. म्हणूनच या वेळी धावल्यामुळे चांगले परिणाम दिसत असल्याचं संशोधन सांगतं. अर्थात दुपारच्या वेळी कोणीही धावू शकत नाही. त्यामुळे धावणं टाळण्याऐवजी तुमच्या सोयीची वेळ निवडा आणि भरपूर व्यायाम करा असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे.


# युवा मानस

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| हम सब एक दुसरे के बिना कुछ नहीं है, यही रिश्तों की खूबसूरती है। | हराना है तो मैदान में आके हराना, वरना दिल जीतने की आदत तो बचपन से है। | हुकुमत की है हमने कोई लूट नहीं, वो निलाम भी हुए, तो आखरी बोली हमारी रहेगी। |

**टेक अपडेट्स**

## चॅटबॉटची नवीन क्षमता




चॅटबॉट नवीन व्हॉइस आणि इमेज क्षमता सादर करणार आहे. त्यामुळे वापरकर्त्यांना आपला आवाज वापरून प्रश्न विचारता येतील आणि हे उपकरण मानवासारखा प्रतिसाद मिळेल. याचा अर्थ असा, की तुम्ही व्हॉइस असिस्टंटशी बोलता तसे आता चॅटबॉटशीही बोलू शकाल. चॅटबॉट तोंडी उत्तर देईल. त्याला क्रॉस प्रश्नदेखील विचारता येऊ शकतील. ञओपन एआयफनुसार, चॅटजीपीटी वापरकर्ते आता मोबाइल फोनवरून चॅटबॉट्सशी संवाद साधू शकतात आणि रिअल-टाइममध्ये प्रतिसाददेखील प्राप्त करू शकतात. नवीन अपडेट मिळवण्यासाठी प्रथम मोबाइलवर चॅटजीपीटी उघडा. त्यानंतर सेटिंग्ज मध्ये जा. येथे तुम्हाला नवीन वैशिष्ट्ये पर्यायाखाली व्हॉइस चॅट सक्षम करण्याचा पर्याय मिळेल. ते चालू केल्यानंतर तुम्ही चॅटबॉटशी बोलू शकता.

**टेक टॉक**

## स्मार्टफोनची सुरक्षितता कशी कराल?

आजच्या डिजिटल युगात स्मार्टफोन सुरक्षिता लॉक करणे आवश्यकच आहे. यासाठी फिंगरप्रिंट, फेस लॉक, पॅटर्न लॉक आणि पिन कोड हे पर्याय आहेत. फिंगरप्रिंट लॉक झपाट्याने फोन अनलॉक करते. पण याचे काही तोटेही आहेत. झोपेत असताना कोणी तुमचे बोट फोनवर ठेवले तर लॉक उघडू शकते. तसेच ओलसर किंवा मळलेले बोट असले, तर फोन अनलॉक करण्यात अडचण येते. फेस अनलॉक वापरणे अत्यंत सोयीचे वाटते पण बहुतांश स्मार्टफोनमध्ये २ डी फेस रेकग्निशन असते. ते कॅमेऱ्याच्या सहाय्याने चेहरा स्कॅन करते आणि कधीकधी फोटोवरूनसुद्धा फोन उघडू शकतो. आयफोनसारख्या प्रीमियम फोनमध्ये थ्री डी फेस आयडी अधिक सुरक्षित असतो. पण तोही कमी प्रकाशात अचूक काम करत नाही. पॅटर्न लॉक लोकप्रिय आहे कारण ते वापरणे सोपे आहे; मात्र स्क्रीनवर उरलेले बोटांचे ठसे आणि सहज ओळखता येणाऱ्या डिझाइन्समुळे ते फारसे सुरक्षित मानले जात नाही. पिन कोड हा आजही सर्वात विश्वासार्ह पर्याय मानला जातो. विशेषतः तुम्ही आठ अंकी पिन किंवा अल्फान्यूमेरिक पासवर्ड वापरत असाल तर डेटा हॅक करणे जवळजवळ अशक्य होते. पिन कोड कोणाच्या चेहऱ्यावरून, बोटावरून किंवा पॅटर्नवरून ओळखता येत नाही. म्हणून तो सर्वाधिक सुरक्षित आहे.



**टेक अपडेट्स**



## क्यूआर कोड स्कॅनने होणार सर्व कामे

सध्या तुम्हाला प्रत्येक महत्त्वाच्या कामासाठी आधार कार्ड सोबत न्यावे लागते; परंतु आता आधार ॲपमध्ये फक्त क्यूआर कोड स्कॅन करून तुम्ही स्वतःची ओळख पटवू शकता. आधार ॲप डाउनलोड करून क्यूआर कोड स्कॅनफ करायचा आहे. क्यूआर कोड स्कॅन केल्यावर तुमची सर्व माहिती स्क्रिनवर दिसणार आहे. यामध्ये तुमचे डिजिटल आधारकार्डदेखील दिसणार आहे. या नवीन ॲपमुळे तुम्हाला आधार कार्ड सोबत ठेवण्याची गरज नाही. त्याचा फोटोदेखील ठेवणे गरजेचे नाही.आता व्हेरिफिकेशन खूप सोपे होणार आहे. आधार ॲपमध्ये जाऊन फेस आयडी ऑथेंटिकेशन करून तुम्ही तुमची ओळख पटवू शकतात. यूपीआय ॲप काम करते त्याचप्रकारे तुम्हाला आधार ॲपमध्ये जाऊन क्यूआर कोड स्कॅन करायचा आहे. याचपद्धतीने तुमची माहिती दुसऱ्या व्यक्तीला देऊ शकता. खेरीज आवश्यक तेवढी माहितीच शेअर करू शकता.

# महिला वकिलाला रिंगण करून अमानुषपणे मारहाण; कारवाईसाठी असोएिशनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

नगर – बीड जिल्ह्यात अंबेजोगाई तालुक्यात सनगाव येथे धक्कादायक व संतापजनक घटना घडलेली आहे. अंबाजोगाई सत्र न्यायालयात वकीली करणाऱ्या ॲड. ज्ञानेश्वरी अंजान या महिला वकील भगिनीला गावातील सरपंच व इतर लोकांनी तक्रार केल्याच्या कारणावरुन रिंगण करुन अमानुषपणे काठ्या आणि पाईपच्या सहाय्याने प्रचंड मारहाण केली. या मारहाणीत महिला वकीलाच्या अंगातील रक्त साकाळले असून त्यांच्या पाठीवर काळे निळे वळ वठलेले आहेत. असा गंभीर प्रकार समोर आलेला असून सदर घटनेचा अहमदनगर बार असोसिएशन तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत आहे. तसेच सदर आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्याकरीता पाठपुरावा करणार आहे.



अंबेजोगाईत महिला वकिलावर झालेल्या मारहाणीचा निषेध करुन अहमदनगर बार असोसिएशनकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

असे प्रकार वारंवार समोर येत आहेत. सातत्याने वकील बांधवांवर हल्ले होत आहेत. हल्ले करणाऱ्या प्रवृत्तीत वाढ होत आहेत. तसेच वारंवार वकीलांवर कोणतेही कारण नसताना प्राणघातक हल्ले होत आहेत. त्यामुळे वकीलांच्या संरक्षणाचा प्रश्न नेहमी सतावत आहे. वकीलांच्या संरक्षणासाठी वारंवार पाठपुरावा करुन देखील कायद्यात तरतुद होताना दिसत नाही. त्यामुळे वकीलांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहे. त्यामुळे वकीलांना कायदेशीर संरक्षण मिळण्यासाठी ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट संमत होउन त्याची अंमलबजावणी तातडीने होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास यापुढे देखील वकीलांवर अशा प्रकारचे हल्ले होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे लवकरात लवकर वकीलांच्या संरक्षणासाठी ॲडव्होकेट प्रोटेक्शन ॲक्ट मंजूर होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास वकीलांना लोकशाही मार्गाने कडक आंदोलन करावे लागेल याची नोंद घ्यावी. याबाबत अहमदनगर बार असोसिएशन अहिल्यानगरच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेश कातोरे, उपाध्यक्ष ॲड. वैभव आघाव, खजिनदार ॲड. अनुराधा येवले, सचिव ॲड. संदीप बुरके, ॲड. सुरेश लगड, ॲड. मनीषा केळकंद्रे, ॲड. अनिता दिघे, ॲड. एस. एस. गायकवाड, ॲड. साहेबराव चौधरी, ॲड. अभी देशमुख, ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. अजिंक्य काळे, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. गौरी बसामलेटी, ॲड. विजया कोतकर, ॲड. क्रांती बागुल, ॲड. तहेसिन शेख, ॲड. राजवाडा शेख यांच्यासह अनेक वरिष्ठ वकील उपस्थित होते. या घटनेविरोधात संपूर्ण वकिल समाजात संताप असून, महिलांच्या सुरक्षेसाठी अधिक कठोर आणि प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

# आनंदधाम येथे २३ एप्रिलला होणाऱ्या जैन महासंमेलनात समाजबांधवांनी सहभागी व्हावे

नगर – श्री ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, नवी दिल्ली – चतुर्थ झोन आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व जैन संघटनांच्या संयुक्त विद्यमाने २३ एप्रिल रोजी आनंदधाम येथे होणाऱ्या महासंमेलनास शहरासह जिल्ह्यातील जैन समाजातील बंधू-भगिनींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जैन मंदिर, कापड बाजारचे अध्यक्ष सुभाष मुथा यांनी केले आहे.



सुभाष मुथा

नगरमध्ये होणारे हे महासंमेलन केवळ एक कार्यक्रम नसून, जैन समाजाच्या हक्कांचे आणि अस्तित्वाचे भान समाजबांधवांपर्यंत पोहोचवणारी एक प्रभावी जनजागृती चळवळ आहे. महाराष्ट्र शासनाच्या जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. ललित गांधी व अखिल भारतीय जैन कॉन्फरन्स – अल्पसंख्याक योजना विभागाचे कांतिकुमार जैन मार्गदर्शन करणार आहेत. शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक आणि कायदेशीर बाबींमध्ये अल्पसंख्याक जैन समाजासाठी असलेल्या योजना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचवण्याचे हे महत्त्वाचे पाऊल आहे. जैन समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अल्पसंख्याक दर्जाचे फायदे आणि लाभ पोहोचावेत, या दृष्टिकोनातून जैन समाजातील सर्व बांधव-भगिनींनी या महासंमेलनात सहभागी व्हावे.

# नगर जिल्ह्यातील ४८ पोलिसांना मिळाली 'हवालदारपदी' पदोन्नती

नगर – जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या ४८ पोलीस नाईक यांना पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. प्रभारी पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांनी याबाबत आदेश काढले आहेत. दरम्यान, यामध्ये विभागीय चौकशी व न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित असलेल्या २० जणांचा समावेश आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या पदोन्नतीच्या निर्णयान्वये व सर्वोच्च न्यायालयात दाखल अनुमती याचिकेच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून ही पदोन्नती देण्यात आली आहे. जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेल्या ४८ अंमलदारांना पोलीस नाईक या पदावरून पोलीस हवालदार या पदावर सध्याच्या नेमणुकीच्या ठिकाणी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरती दिनांकापासून पदोन्नती आदेश निर्गमीत झाले दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, यामध्ये २० अंमलदारांची विभागीय चौकशी किंवा न्यायालयीन कार्यवाही सुरू असल्याने त्यांना तात्पुरत्या स्वरूपात ११ महिन्यांसाठी किंवा विभागीय चौकशी/न्यायालयीन कार्यवाही अंतिम होईल यापैकी जे आगोदर होईल तेवढ्या कालावधीसाठी अटींच्या अधिन राहून निव्वळ तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे, असे देखील आदेशात नमूद केले आहे.

**पदोन्नती मिळालेले पोलीस नाईक व कंसात नेमणुकीचे ठिकाण** – वैभव साळवे (पाथर्डी), राजकुमार सुर्यवंशी (पोलीस मुख्यालय), विष्णू भागवत (एमआयडीसी), रामदास सोनवणे (पाथर्डी), संभाजी घायतडक (मोटार परिवहन विभाग), संगीता खेमनर (आश्वी), दुर्गा कांदळकर (शेवगाव), कावेरी घुले (नियंत्रण कक्ष), सचिन उगले (संगमनेर तालुका), सलिम शेख (अहिल्यानगर तालुका), ईश्वर गर्जे (शेवगाव), बाळासाहेब तागड (सोनई), संदीप आव्हाड (शेवगाव), आदीनाथ वामन (शेवगाव), संभाजी बडे (राहुरी), बापुसाहेब गोरे (कोतवाली), निता अडसरे (कोतवाली), आदिनाथ मुळे (अहिल्यानगर तालुका), अनिता मरभर (तोफखाना), संजय माने (नेवासा), कृष्णा कुन्हे (शिर्डी), सतीष काटे (कोपरगाव शहर), ज्ञानेश्वर सोनवणे (पोलीस मुख्यालय), राहुल सोळुंके (एलसीबी), संध्या म्हस्के (तोफखाना), धर्मराज दहिफळे (अहिल्यानगर तालुका), किशोर लाड (अहिल्यानगर तालुका), सचिन धनाड (शिर्डी), अंकुश बोडखे (नियंत्रण कक्ष), संजय डाळींबकर (पोलीस मुख्यालय), अण्णा पवार (पाथर्डी), महेश पालवे (मोटार परिवहन विभाग), सोमिनाथ बांगर (पाथर्डी), अरविंद भिंगारदिवे (पाथर्डी), रामनाथ सानप (राहुरी), चांगदेव आंधळे (तोफखाना), अरूण गांगर्डे (नेवासा), बाबासाहेब सातपुते (पोलीस मुख्यालय), संदीप पांडे (पोलीस मुख्यालय), अजित घुले (अकोले), गुलाब मोरे (श्रीगोंदा), बापुराव देशमुख (पोलीस मुख्यालय), संदीप धामणे (खर्डा), संतोष खैरे (सायबर), रवींद्र कडिले (साई मंदिर सुरक्षा, शिर्डी), प्रवीण अंधारे (कर्जत), बाळासाहेब बाचकर (सोनई), भाऊसाहेब सानप (साई मंदिर सुरक्षा, शिर्डी).

# नीता अडसरे व बापू गोरे यांना पोलिस हवालदारपदी पदोन्नती

नगर – कोतवाली पोलीस ठाण्यातील दोन पोलीस नाईक यांना पदोन्नती मिळाल्याने त्यांची पोलिस हवालदार या पदावर बढती झाली. पोलीस नाईक नीता अडसरे व पोलीस नाईक बापू गोरे असे पदोन्नती झालेल्या दोन पोलीस अंमलदारांचे नावे आहेत.





कोतवाली पोलीस ठाण्यातील पोलीस नाईक नीता अडसरे व बापू गोरे यांना पोलिस हवालदार पदी पदोन्नती मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना पोलिस उपअधिक्षक अमोल भारती व पो.नि. प्रताप दराडे.

पोलीस उपाधीक्षक (नगर शहर विभाग) अमोल भारती आणि कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पोलीस अंमलदार निता शाम आडसरे या २००८ मध्ये बृहन्मुंबई येथे पोलीस दलात भरती झाल्या मुंबई येथे नऊ वर्ष नोकरी केल्यानंतर सन २०१८ साली त्या नगरमध्ये बदलून आल्या. नगर येथे आल्यानंतर त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाणे येथे काही दिवस नोकरी केली. सध्या त्या कोतवाली पोलीस ठाणे येथे कार्यरत आहेत.

पोलीस अंमलदार बापू लक्ष्मण गोरे हे सन २०१८ बृहन्मुंबई येथे पोलीस दलात भरती झाले मुंबई येथे दहा वर्ष नोकरी केल्यानंतर त्यांची बदली अ.नगर जिल्हात झाली. पोलीस आमदार गोरे यांनी पोलीस उपाधीक्षक कार्यालयात एक वर्ष नोकरी केली त्यानंतर सध्याचे कोतवाली पोलीस ठाणे येथे कार्यरत आहेत. दोन्ही पोलिस अंमलदार यांना पोलीस उप अधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक योगिता कोकाटे यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी बढती झाल्याच्या शुभेच्छा दिल्या.

# खुन, दरोडे, खंडणीसाठी अपहरण, बलात्कारसारखे गुन्हे करणाऱ्या सात जणांच्या टोळीला लावला मोक्का

नगर – नगर जिल्ह्यात खुन, दरोडे, खंडणीसाठी अपहरण, बलात्कार यासंह गावठी कट्टे बाळगून दहशत करत गंभीर गुन्हे करणाऱ्या ७ जणांच्या टोळीवर मोक्का लावण्यात आला आहे. पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी पाठविलेल्या मोक्काच्या या प्रस्तावाला नाशिक परिक्षेत्रचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी नुकतीच मंजुरी दिली आहे.

टोळी प्रमुख विनोद बबन बर्डे (वय २७), संदिप बबन बर्डे (वय ३७), राहुल दिलीप येवले (वय २२), भारत येलप्पा फुलमाळी (चौघे रा.वारणी ता.शिरुर कासार जि.बीड), शुभम शहादेव धायतडक (वय २२, रा.धायतडकवाडी ता.पाथर्डी), बाळासाहेब दगडु बडे (वय २३, रा.टाकळीमानुर ता.पाथर्डी), अमोल सुभाष मंजुळे (वय २४, रा.वडगाव तनपुरा, ता.कर्जत), हनु ऊर्फ हनुमंत गोल्हार (रा.पाथर्डी) अशी मोक्का लागलेल्या टोळीतील आरोपींची नावे आहेत.

या टोळीने १८ जानेवारीला सकाळी ९.०५ च्या सुमारास कर्जत कृषि उत्पन्न बाजार समितीचे गेटवर व्यापाऱ्याच्या अंगावर मिरची पुड टाकुन मारहाण करत त्यांच्या कडील पैश्याची बॅग बळजबरीने चोरुन नेण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी झालेल्या झटापटीत एका आरोपीकडे असलेले गावठी पिस्टल खाली पडले होते. या प्रकरणी रामराजे प्रफुल्ल नेटके (रा.भांडेवाडी,ता. कर्जत) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचे तपासात विनोद बर्डे, राहुल येवले, शुभम धायतडक, संदिप बर्डे बाळासाहेब बडे यांना अटक करण्यात आलेली आहे. तर आरोपी अमोल मंजुळे, भारत फुलमाळी, हनुमंत गोल्हार हे अद्याप फरार आहेत. या आरोपींविरुध्द यापुर्वी दरोडा,घरफोडी चोरी, खुन करणे, अग्नीशस्त्रासह खंडणीसाठी अपहरण करणे, बलात्कार करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.

त्यामुळे या टोळीवर कर्जतचे पोलीस निरीक्षक दौलतराव जाधव यांनी सदर बाबत पोलीस अधीक्षक राकेश ओला व अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांचे मार्फतीने विशेष पोलीस महानिरीक्षक यांना मोक्का कायद्यातील वाढीव कलम लावण्याची मंजुरी मिळणेकामी अहवाल सादर केला होता. त्यास नुकतीच मंजुरी मिळाली आहे.





महानगरपालिका अग्निशमन दलाच्या विभागाने राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त न्यू आर्टस्, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज येथील महाविद्यालयातील भूगोल विभागाकरिता अग्निशमन सुरक्षितता, सुरक्षा प्रशिक्षण, प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत प्रात्यक्षिके आणि प्रशिक्षण देण्यात आले.

# अग्निशमन सेवा सप्ताहात आग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत जनजागृती

## जवानांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखवून अग्नीसुरक्षेचे दिले धडे; इमारती, घरांच्या बांधकामावेळी अग्नीसुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात : आयुक्त यशवंत डांगे

नगर – अग्निशमन सेवा सप्ताहाच्या निमित्ताने १५ ते २० एप्रिल या कालावधीत शहरात महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्यावतीने नागरिकांमध्ये आग प्रतिबंधात्मक उपाययोजना, अग्नी सुरक्षेबाबत घ्यावयाची काळजी आदींबाबत जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके दाखवून अग्नी सुरक्षेचे धडे देण्यात आले. प्रत्येक घर, इमारत ती व्यावसायिक असो अथवा निवासी असो, सर्वांनी बांधकाम करताना अग्नी सुरक्षेचा गांभीर्याने विचार करून तशा उपाययोजना कराव्यात. यातून आगीची घटना घडल्यास त्वरित तत्काळ नियंत्रण मिळवण्यास मदत होईल, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

१५ ते २० एप्रिल या कालावधीत अहिल्यानगर महानगरपालिका अग्निशमन दलाच्या विभागाने राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह राबवला. या निमित्ताने न्यू आर्टस् कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज येथील महाविद्यालयातील भूगोल विभागाकरिता अग्निशमन सुरक्षितता, सुरक्षा प्रशिक्षण, प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत प्रात्यक्षिके आणि प्रशिक्षण देण्यात आले. तसेच मॉक ड्रिलचे आयोजन करून कॉलेजमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांना आग लागल्यास तात्काळ करावयाची कार्यवाही, अग्निशामक यंत्रांचा वापर, सुरक्षित रितीने बाहेर पडण्याच्या उपाययोजना याविषयी सखोल माहिती देण्यात आली. प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून दाखवण्यात आल्यामुळे विद्यार्थी, नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जागरूकता आणि आत्मविश्वास वाढीस मोठी मदत होणार आहे. यावेळी मुख्यअग्निशमन अधिकारी शंकर मिसाळ, वाहन चालक विंधू भांगरे, फायरमन शुभम गावडे, दिनेश शिंदे, अविनाश साठे, सागर भिंगारदिवे, तसेच धीरज जावळे व संकेत साठे यांनी प्रभावी मार्गदर्शन केले.

सध्या उन्हाळ्याचे दिवस असून आगीच्या घटना घडू शकतात. त्यामुळे नागरिकांनी उघड्यावर, काटवणात कचरा पेटवू नये. यातील मोठी आग लागून हरित क्षेत्राचे नुकसान होऊ शकते. निवासी क्षेत्रात असे प्रकार केल्यास यातून आगीची मोठी दुर्घटना घडू शकते. तसेच, कचरा जाळणे हा गुन्हा असून, संबंधितावर फौजदारी कारवाई होऊ शकते. आगीच्या घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.

# मेहेर नझर मधील अवतार 'मेहेरबाबांच्या फिल्मोत्सव'चे २३ एप्रिल रोजी आयोजन

नगर – येथील सरोष पेट्रोल पंपाजवळील अवतार मेहेरबाबा केंद्र येथे २३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते ९ या दरम्यान सर्व ईश्वरप्रेमींना अवतार मेहेरबाबांच्या जीवनावर आधारित मेहेराबाद येथे तयार झालेले लघुचित्रपट दाखविण्यात येणार आहे.

मेहेरबाबांची बहिण, मनी ईराणी यांच्या फॅमिली लेटर्स क्रमांक ३२ मधील अप्रतिम साउंडट्रॅक आणि अतुलनीय वर्णन असलेला एक सुंदर मराठीतील लघुपट अनेक प्रदर्शनांना पात्र आहे. बाबांचे भाऊ जाल एस ईराणी आणि डॉन स्टिव्हन्स यांचे फुटेज. रॉबर्ट फ्रेड्रीक यांची फिल्म.

एक अप्रतिम हिंदीतील ॲनिमेटेड फिल्म... राजकुमार सिद्धार्थ गौतम, प्रबुध्द कसे झाले याचा प्रवास. बुध्दांच्या बालपणापासुन ते निर्वाण प्राप्त होईपर्यंतची कथा सांगण्यासाठी या फिल्ममध्ये अप्रतिम ॲनिमेटेड तंत्रज्ञान वापरले गेले आहे. सत्य, नैतिकता आणि तरुण पिढीसाठी त्याग या गुणांचे प्रतिबिंब या कथेत उमटले आहे. सर्व वयोगटांसाठीची ही कथा सर एडविन अरनॉल्ड यांच्या 'लाईट ऑफ एशिया' या सुंदर दिर्घ कवितेवर आधारित आहे. सन २०१७ मध्ये सिंगापूर, मनिला आणि भारतातील निर्मित. पेंटामिडीया ग्राफिक्स. दिग्दर्शक शंभु एस. फाळके. १ तास २५ मिनिटे. फिल्मोत्सव विनामुल्य असून सर्व ईश्वर प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन अवतार मेहेरबाबा ट्रस्टच्यावतीने करण्यात आले आहे.


**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग**

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर**

कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा धरण विभाग संगमनेर यांचे कार्यालय, पाटबंधारे वसाहत, नाशिक-पुणे रोड, घुलेवाडी ता. संगमनेर जि. अहमदनगर

eeupdd.ghlwdiwrd@maharashtra.gov.in /ceupdsmgr@gmail.com दुरध्वनी- ०२४२५-२२५७३२

**ई- निविदा सूचना क्र. ०१ सन २०२५-२०२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता **ब-१ नमुन्या अंतर्गत** ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in, http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| कामाचे नाव:- | ऊर्ध्व प्रवरा डावा कालवा नलिका मोरी सा.क्र.१७०००, १७४२३ व १७७०० मी.या कि.मी. १८ मधील मार्केट कमिटी भागातील कालवा ड्रेनेज चे काम व अगस्ती साखर कारखाना येथील कालवा तळ सा. क्र. ९८४० मी. मधील MS पाईप स्थलांतरित करणे. |
| जिल्हा:- | अहिल्यानगर |
| निविदेची किंमत रुपये :- | रु. १७३.९३ लक्ष |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी:- | दि. २१/०४/२०२५ सकाळी ११.०० वा. ते दि.०६/०५/२०२५ सायंकाळी- १८:०० वा. पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा कालावधी:- | दि.०७/०५/२०२५ सायंकाळी १८:०० वा. |

जाक्र. उप्रधवि/लेशा/निविदा/१२८५/सन २०२५
उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर
दिनांक : १६/०४/२०२५

**(प्र. ना. हापसे)**
कार्यकारी अभियंता,
उर्ध्व प्रवरा धरण विभाग, संगमनेर


# आवाजाच्या क्षेत्रातील 'विविध संधी' यावर IMS SEEDC मार्फत ४ दिवसीय कार्यशाळा

नगर – IMS SEEDC तर्फे २ ते ५ मे दरम्यान द पॉवर ऑफ व्हॉइस – आवाजाच्या क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी या विषयावर चार दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा सकाळी ११ ते दुपारी २ व ५ ते ७ या वेळेत IMS SEEDC येथे आयोजित केली जाणार आहे.

या कार्यशाळेमध्ये आवाजाच्या क्षेत्रातील विविध संधी, प्रभावी बोलणे व संवाद कौशल्य, व्यक्तिमत्व विकास या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कार्यशाळेचे मार्गदर्शन आवाजाच्या क्षेत्रातील २० वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या तज्ञ सौ. वीणा दिघे या करणार आहेत. ही कार्यशाळा १८ वर्षांवरील सर्व इच्छुकांसाठी खुली असून, अभिनय, निवेदन, शिक्षण, प्रशिक्षण, संभाषण, निवड मुलाखती आणि स्वतःचा आत्मविश्वास वाढवण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आयोजकांनी सांगितले आहे.

या कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येकाला प्रभावी व्यक्तिमत्व घडवण्यासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत कौशल्यांचे प्रशिक्षण मिळणार असून, व्यावसायिक व कला क्षेत्रातील संधींचा वेधही घेतला जाणार आहे.

कार्यशाळेसाठी नावनोंदणी सुरू असून, अधिक माहितीसाठी डॉ. ऋचा तांदुळवडकर (मो. ९८५०३७०१४१) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांनी केले आहे.

अशा प्रकारची कार्यशाळा नगरमध्ये पहिल्यांदाच होत असून जास्तीत जास्त लोकांनी याचा फायदा घ्यावा असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल मुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य मुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

